पुणे शहर पोलीस

# दर्पण

## सप्टेंबर २०१९

# अभिप्राय...

'दर्पण' पुस्तकाबाबत..

मी पोना ६६३२ कुमार, नेमणूक हिंजवडी पो.स्टे.

सध्या मी हिंजवडी पो.स्टे. येथे डी.ओ./ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्य करित आहे. पुण्याचे पोलिस आयुक्त श्री. डॉ. के. वेंकटेशम् सर यांनी पोलिस दलाची जनमानसात प्रतिमा उंचावण्यासाठी 'दर्पण' पुस्तकाची संकल्पना सुरु केली आहे. या दर्पण पुस्तकामध्ये पोलिस अधिकारी/व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाचा गौरव फोटो सहित छापला गेला त्यामुळे समाजातील लोकांना पोलिस सुध्दा चांगले काम करतो आहे याची जाणीव होवू लागली आहे. त्यामुळे पोलिसांची प्रतिमा चांगली होण्यास मदत झाली आहे. दर्पण पुस्तकामध्ये पोलिसांचे कामाचा चांगल्या कामाचा गौरव केला जातो हे पाहून इतर पोलिस बांधव हे सुध्दा चांगले काम करण्याची इच्छा बाळगुन चांगले काम करणे बद्दल सर्वांनी प्रयत्न करतात.

'दर्पण' पुस्तक खरोखरच पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरवाचेच पुस्तक आहे असे मला वाटते.

पोना ६६३२ कुमार पीडी
हिंजवडी पो.स्टे. पुणे

## गुडवर्क व दर्पण या पुस्तका बाबत अभिप्राय

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामास (Good Work) वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्याचा व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या कात्रणांपासून तयार केलेले दर्पण हे पुस्तक नागरिकांना पाहणेसाठी पोलीस स्टेशन स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. हा उपक्रम हा अत्यंत चांगला आहे.

या उपक्रमामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्या दरम्यान स्वयंस्फुर्तीने चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच अशा केलेल्या चांगल्या कामाची माहिती ही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्हॉटस्‌ॲप ग्रुप्सवर प्रसिध्द होत असल्याने त्याबाबत इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छा देण्यात येतात त्यामुळे चांगले काम केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच इतरांना चांगले काम करण्याची व त्यास प्रसिध्दी देण्याची ईर्शा निर्माण होते.

तसेच दर्पण हे पुस्तक येरवडा पोलीस स्टेशन येथे येणारे नागरिक वाचतात व पोलीसांचे चांगले कामाबद्दल चर्चा करतात. तसेच पोलीसांचे कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होत आहे. वर्तमान पत्रातील चांगल्या कामाचे प्रसिध्दी मुळे नागरिक समक्ष भेटून अभिनंदन व शुभेच्छा देतात. त्यामुळे एकप्रकारे चांगला अनुभव मिळतो व त्यातून अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. सदरचे उपक्रम हे अत्यंत चांगले असून ते यापुढेही कायमस्वरूपी चालू ठेवावेत.

( शुभांगी मगदुम )
महिला पोलीस उप निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

# कारवाई

The Indian EXPRESS - 7 September, 2019

# Three arrested in Delhi for 'stealing watches' in Pune

## Search on for 1 suspect; cops say gang committed thefts in Delhi, Mumbai

**EXPRESS NEWS SERVICE**
PUNE, SEPTEMBER 6

THE PUNE City Police Crime Branch arrested three men in New Delhi Friday for allegedly stealing four RADO wrist watches worth Rs 5.04 lakh from a shop in Pavillion Mall on Senapati Bapat Road last month.

The accused have been identified as Ashish Kushal Bist (30), Akash Balkisan Dhaka (26) and Ravindarsingh Amarjeetsingh (32). Search is on for the fourth accomplice. The accused have committed several thefts in Mumbai and Pune, police said. They would travel to the cities by air and steal costly, branded products from shopping malls, police said.

The incident in Pune took place on August 8, when the accused stole four RADO wrist watches from Ethos Watch Shop at Pavillion Mall. An offence in this case was registered at Chaturshringi police station.

A Crime Branch team launched an investigation based on clues obtained from CCTV cameras at the mall. The police learnt that the accused came to Pune by flight and travelled to the mall in a tourist cab. Before coming to Pavillion Mall, the accused went to two other shopping malls in the city and attempted thefts, police said. Failing in these attempts, they went to Pavillion Mall and stole the wrist watches, police said.

After the police learnt that the accused were residents of Delhi, a Crime Branch team went to the city. "Five days after arriving in Delhi, Crime Branch officials arrested the three men. Probe revealed they committed similar thefts in shopping malls in other metros like Delhi and Mumbai," said Deputy Commissioner of Police (Crime) Bachchan Singh.

Police said the accused used to wear branded clothes while entering the shopping malls so that staff and salespeople did not suspect them. "They used some of the stolen products themselves and sold the others. We are yet to recover the stolen wrist watches from them. Search is on for one more accomplice," said Senior Police Inspector Anjum Bagwan.

The Indian EXPRESS - 23 September, 2019



The seized tusks are valued at Rs 80 lakh. *Express*

# Man from Telangana arrested for 'trying to sell elephant tusks'

**EXPRESS NEWS SERVICE**
PUNE, SEPTEMBER 22

THE PUNE City Police's Crime Branch on Saturday seized "carved" elephant tusks valued at Rs 80 lakh which a man had smuggled to Pune. The 50-year-old suspect who is from Telangana, has been identified as Bhima Bogria Mudavat.

The Crime Branch Unit II received a tip-off that a person was coming to Pune to sell elephant tusks. A trap was laid and Mudavat, who is from Kollapur in Telangana, was detained. The police team found four carved ivory tusks in his bag.

After primary confirmation from the Forest Department officials that the seized objects were ivory, an offence under the Wildlife (Protection) Act was registered. The value of the seized ivory in the illegal international market is said to be more than Rs 80 lakh.

Inspector Gajanan Pawar, who led the Crime Branch team, said, "The seized tusks seem to be old and the suspect was trying to sell them as antiques. We have launched a probe into the source of the seized tusks and also the buyer. We are also probing where there is any organised group behind this trade."

He added, "The arrested suspect does not have any known criminal record in Maharashtra that we know of till now. We are inquiring with other states. He is from Telangana and has been coming to Pune. He has told us that he is a mason but we have reason to believe it is not the only thing that he does."

In a related development in June, the Sinhagad Road police station had arrested four persons who were trying to sell elephant tusks. The value of the seized ivory in illegal international market was at least Rs 3.5 crore, police said.

The Indian EXPRESS - 23 September, 2019

# 2 Nigerians arrested from Delhi for cheating Pune woman of Rs 28,500

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, SEPTEMBER 28

PUNE CITY Police's cyber station personnel have arrested two Nigerian nationals from Delhi for allegedly cheating a woman who had uploaded her details on a matrimonial website. Police have identified the two accused as Godson William Osei (29) and Chukwuemeka Levi Mbanelo (27). The duo are residents of Tughlakabad Extension in Delhi.

The victim, a resident of Ambegaon, had lodged an offence in this case at the Bharati Vidyapeeth police station.

Police said the complainant had uploaded her details on a matrimonial website, following which she received a request from one 'Avnish Kumar'. After the woman accepted this request, 'Avnish Kumar' proposed marriage and told her that he had sent an expensive gift for her. He told the woman that Customs officials at Delhi Airport have taken the gift into their custody.

'Avnish Kumar' then shared a bank account number with the woman and asked her to transfer Rs 28,500 to it as charges for releasing the gift from the Customs department. After the woman deposited the money, she was asked to deposit Rs 75,000 more. Realising something was wrong, the woman approached Pune City Police and filed a complaint of cheating.

When police tracked the mobile phone number used by the fraudsters to contact the complainant, they realised that the accused were located in Delhi.

A team from the cyber police station reached Delhi and nabbed the two Nigerian nationals on Wednesday. "Police seized a WiFi router, 10 cell phones, two debit cards, two laptops, a card holder and a bank passbook from the accused persons," stated a police press release.

Deputy Commissioner of Police, EOW and cyber crime, Sambhaji Kadam said, "We have arrested the two Nigerian nationals and after completing due legal procedures, they have been brought to Pune today."

Police are looking into how long the duo has been in India, their visa details, and if they were involved in other cheating cases.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १८ सप्टेंबर, २०१९

# पिस्तूल बाळगणारा एक जण अटकेत



पुणे : बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्या तरुणाला वानवडी पोलिसांनी सोमवारी रात्री रेसकोर्स परिसरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडे गावठी पिस्तूल व जिवंत काडतुसे असा ३५ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

सोन्या उर्फ हृषीकेश राजेंद्र चव्हाण (वय २०, रा. दौंड) असे अटक केलेल्याचे नाव आहे. वानवडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घातल होते. त्यांना माहिती मिळाली, की एक व्यक्ती रेसकोर्स येथील पाण्याच्या टाकीजवळ उभा आहे. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक क्रांतीकुमार पाटील यांच्या पथकाने त्या तरुणास पकडले. त्याच्याकडे चौकशी केली. त्या वेळी त्याच्याकडे एक गावठी बनावटीचे पिस्तूल व व एक जिवंत काडतूस आढळून आले. त्यानुसार त्याच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. त्याने हे पिस्तूल कोठून आणले, याचा तपास पोलिस करीत आहेत.

लोकमत – दि. ५ सप्टेंबर, २०१९

# दोन कोटींच्या दरोड्यातील मुख्य सूत्रधार ४ वर्षांनी जाळ्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सेनापती बापट रोडवरील लाईफ जनरल इन्स्युरन्स कंपनीवर दरोडा टाकून २ कोटी रुपये चोरून नेणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधाराला तब्बल ४ वर्षांनी पकडण्यात पुणे पोलिसांच्या विशेष पथकाला यश आले.

संजय चंद्रकांत गंभीर (वय ४६, रा. रावेत, पुनावळे) असे त्याचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी यापूर्वी ११ जणांना अटक केली होती. मात्र, संजय गंभीर हा मुख्य सूत्रधार पोलिसांच्या हाती लागत नव्हता.

गुन्हे शाखेकडून पुणे शहरातील फरार आरोपींच्या शोधाकरिता सहायक पोलीस आयुक्त शिवाजी पवार यांच्या अधिपत्याखाली विशेष पथक स्थापन केले आहे. या पथकातील पोलीस नाईक महेश निंबाळकर यांना संजय गंभीर हा बाणेर रोडवरील सकाळनगरमधील हॉटेल चारुज येथे येणार असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून महेश निंबाळकर व संभाजी नाईक यांनी

हॉटेल चारुजवर सापळा रचून त्याला पकडले. चौकशीत त्याने गुन्हा कबूल केला. लाईफ जनरल इन्स्युरन्स अँड ब्रोकरेज या सेनापती बापट रोडवरील कंपनीचे मालक साईराम अय्यर यांना

कंपनीच्या कामासाठी मुंबईला ऑफिस घ्यायचे होते. त्याच्या व्यवहारासाठी १ जून २०१५ रोजी २ कोटी रुपयांची रक्कम ऑफिसमध्ये आणली होती. ऑफिसमधील सेल्स कर्मचारी मनोज एलपूर (रा. पिंपरी) याला माहिती होती. त्याने मित्रांच्या मदतीने ही रक्कम चोरीचा कट आखला. ९ जून २०१५ रोजी सायंकाळी धाडसी दरोडा टाकून ऑफिसमधील १ कोटी ९७ लाखांची रोकड चोरून नेली होती.

चतु:शृंगी पोलिसांनी मनोज एलपूर, चंद्रकांत बेलवटे (रा. चिंचवड), अमित सांगळे (रा. निगडी) व इतर आठ अशा ११ जणांना अटक केली होती. दरोडा टाकल्यानंतर संजय गंभीर फरार झाला होता.

संजय गंभीर याच्यावर यापूर्वी बँक ऑफ महाराष्ट्रकडे जप्त केलेल्या मालमत्ता निम्म्या किमतीत मिळवून देतो, असे सांगून १० साथीदारांसह नागरिकांना २ कोटी रुपयांची फसवणूक केली होती. याप्रकरणी २०१२ मध्ये त्याला अटक झाली होती. याशिवाय २०११ मध्ये टेक महिंद्रा कंपनीमध्ये नोकरी लावून देतो, असे सांगून लोकांकडून पैसे घेऊन नोकरी न लावता फसवणूक केल्याबाबत गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात संजय गंभीर गेली ९ वर्षे फरार आहे.

अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चनसिंग, सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नाईक महेश निंबाळकर, संभाजी नाईक, महेश पवार यांच्या पथकाने केली आहे.

**लोकमत** – दि. ५ सप्टेंबर, २०१९

# तीन तडीपार गुंडांना शस्त्रासह अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहर व जिल्ह्यातून तडीपार केले असतानाही शहरात राहणाऱ्या तिघा गुंडांना पोलिसांनी घातक शस्त्रासह अटक केली आहे.

अजिंक्य सुरेश शिंदे (वय २२, रा. लोहियानगर) याला तडीपार केल्यानंतरही तो शहरात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्याला रविवार पेठेतील पागा गणेश मंदिराजवळ घातक शस्त्रासह पकडण्यात आले. त्याच्याविरुद्ध स्वारगेट पोलीस ठाण्यात २०१८ मध्ये खुनाचा प्रयत्नाचा एक तसेच खडक पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, विनयभंग, अंमली पदार्थ जवळ बाळगल्याबद्दल असे ५ गुन्हे दाखल आहेत. त्याला २१ मार्च २०१७ पासून दोन वर्षांसाठी तडीपार केले होते.

गंग्या ऊर्फ विक्की विष्णू आखाडे (वय २२, रा. वारजे माळवाडी) याला वारजे येथील म्हाडा कॉलनीत पकडले. त्याच्याविरुद्ध वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, दरोड्याचे प्रत्येकी एक व गंभीर दुखापतीचे दोन असे ४ गुन्हे दाखल आहेत. त्याला २ एप्रिल २०१९ पासून एक वर्षासाठी तडीपार केले असताना तो शहरात वावरत होता. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, उपनिरीक्षक संजय गायकवाड, किरण अडागळे, हिमालय जोशी व गुन्हे युनिट ३ पथकातील कर्मचारी प्रवीण तापकीर, संदीप तळेकर, अतुल साठे, सचिन गायकवाड, विल्सन डिसोझा, रामदास गोणते, मच्छिंद्र वाळके, रोहिदास लवांडे, शकील शेख, राहुल घाडगे, दत्तात्रय गरुड, दीपक मते, संदीप राठोड यांनी केली.

- सराईत गुंड सोमनाथ नवनाथ अवघडे (वय २१, रा. केळेवाडी, कोथरुड) याला केळेवाडी येथे कोयत्यासह पकडले. त्याच्याविरुद्ध कोथरुड पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत असे दोन गुन्हे दाखल आहेत.
- त्याच्यावर १ सप्टेंबर २०१९ रोजी कारवाई केली होती. न्यायालयाने त्याला गणेशोत्सव काळात पोलीस ठाण्याच्या हद्दीत न राहता स्वत:चे वर्तन चांगले ठेवून इतर ठिकाणी राहण्यास जावे, असा आदेश दिला होता. तरीही न्यायालयाच्या आदेशाचा भंग करुन केळेवाडीत आढळून आला.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. ४ सप्टेंबर, २०१९

# बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत

पुणे : बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्याला सापळा रचून भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याकडून एक पिस्तूल व एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. तसेच, त्या आरोपीला पिस्तूल देणाऱ्यालाही ताब्यात घेण्यात आले आहे.

मनोहर रघुनाथ मांगडे (वय ४२, रा. मांगडेवाडी) व मारुती काटयप्पा घोरपडे (४३, रा. लासुर्णे, ता. इंदापूर) असे अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला असून, याबाबत कर्मचारी कुंदन शिंदे यांनी फिर्याद दिली आहे.

गणेशोत्सावाच्या पार्श्वभूमीवर सराईत गुन्हेगारांसह 'मोस्ट वॉंटेड' आरोपींवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. या वेळी एक व्यक्ती कात्रज परिसरात उभी असून, त्याच्याजवळ बेकायदा पिस्तूल असल्याची माहिती पोलिस कर्मचारी कुंदन शिंदे यांना खबऱ्याकडून मिळाली होती. तपास पथकाचे फौजदार सुब्बराव लाड, कर्मचारी कृष्णा बढे, देशमुख, पवार, सुळ व त्यांच्या पथकाने या ठिकाणी सापळा रचून मनोहर याला पकडले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक गावठी बनावटीचे पिस्तूल व एक जिंवत काडतूस जप्त करण्यात आले आहे. मांगडे याने हे पिस्तूल कशासाठी आणि कोणाकडून आणले होते, याबाबत चौकशी केली असता त्याने आपण हौसेखातर पिस्तूल घेतल्याचे सांगितले.

पोलिसांनी घोरपडे याचा शोध घेऊन त्यालाही पकडले. तेव्हा हे पिस्तूल २०१५ मध्ये एका बिहारी व्यक्तीकडून विकत घेतल्याचे त्याने सांगितले. आरोपींनी पिस्तुलाचा वापर कोठे केला आहे का, याबाबत चौकशी करण्यात येत आहे. मनोहर हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याच्यावर खुनाच्या प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल आहे. तर, घोरपडे याच्यावर कोथरूड पोलिस ठाण्यात आर्म्स ॲक्ट तसेच बारामती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

# बनावट ऑईलच्या बाटल्यांसह एकाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे-सातारा रस्त्याजवळील स्वारगेट कॅनॉल येथे एका व्यक्तीस कॅस्ट्रॉल कंपनीच्या बनावट ऑईलच्या १ हजार ३७८ बाटल्यांसह अटक केली. त्याच्याकडून १ लाख ८३ हजार ६०० रुपयांचे ६८ बॉक्स जप्त केले आहे.

प्रवीणकुमार प्रभुजी शहा (वय ३९, रा. नाथमुरली अपार्टमेंट अरुणा चौक) असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. पुणे-सातारा रस्त्यालगत स्वारगेट कॅनॉल येथे अंगात निळ्या रंगाचा शर्ट घातलेला एक व्यक्ती बनावट कॅस्ट्रॉल कंपनीच्या ऑईलच्या बाटल्यांचे बॉक्स घेऊन थांबला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रहानंद नाईकवाडी यांना मिळाली. त्यांनी तातडीने संबंधित व्यक्तीस पकडण्यासाठी कर्मचाऱ्यांची टीम रवाना केली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शबीर सय्यद यांच्या सूचनेप्रमाणे पोलीस हवालदार साळवे, पोलीस शिपाई कांबळे यांनी सापळा रचून त्यास ताब्यात घेतले. राहुल अशोक शिंदे (वय २९, रा. प्रतिमा अपार्टमेंट, नाना पेठ) असे ताब्यात घेतलेल्या व्यक्तीचे नाव असून त्याच्याकडे अधिक तपास केला असता त्याने आपल्याजवळील बॉक्स हा नाना पेठेतून घेतल्याचे सांगितले. यावरुन पोलिसांनी १ लाखाचे एकूण ६८ बॉक्स ताब्यात घेतले.

लोकमत – दि. १५ सप्टेंबर, २०१९

# मिरवणुकीत ६ टोळ्यांकडून ६0 मोबाइल केले जप्त

## मुंबई, वर्ध्यातील । हरियाणाच्या सहा महिलांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेश विसर्जन मिरवणुकीत गर्दीचा फायदा घेऊन मोबाइल, सोनसाखळी, पाकिटांवर डल्ला मारण्यासाठी आलेल्या ६ टोळ्यांमधील १४ जणांना पकडण्यात फरासखाना पोलिसांना यश आले आहे. त्यांच्याकडून ७ लाख ८२ हजार रुपयांचे ६० मोबाइल जप्त करण्यात आले आहे.

गणेशोत्सव तसेच विसर्जन मिरवणुकीत पोलिसांनी आयटेक बंदोबस्त लावला होता. दगडूशेठ हलवाई गणपतीच्या परिसरात होणाऱ्या गर्दीचा फायदा घेऊन अनेक चोरटे मोबाइल चोऱ्या करीत होते. त्यांच्यावर सीसीटीव्हीचा वॉच ठेवून त्याद्वारे बेलबाग चौकात संशयितरित्या फिरणाऱ्या ६ महिलांच्या टोळीला ताब्यात घेतले. त्या मूळच्या हरियाणा येथील असून दिल्लीतून रेल्वेने विसर्जनाच्या आदल्या दिवशी त्या पुण्यात आल्या होत्या. त्या सर्व जणी बहिण, भावजय अशा नात्यातील आहेत. फरासखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या ५९ हजार रुपयांच्या सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यात त्यांना पकडण्यात आले.



याबाबत फरासखाना पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर यांनी सांगितले की, गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये मोबाइल, पाकीट आणि सोनसाखळी अशा किमती वस्तू चोरण्यासाठी खास आंध्र, कर्नाटक, हरियाणासारख्या राज्यांतून चोरांच्या टोळ्या शहरात येत असतात. तसेच राज्यातील इतर जिल्ह्यातूनही चोरांच्या टोळ्या येतात, हे लक्षात घेऊन फरासखाना पोलिसांनी सीसीटीव्ही तसेच पोलिसांची पथके तयार करुन गुन्हेगारांवर लक्ष ठेवले होते. यामध्ये हरियाणा येथील एका महिलांच्या टोळीला सोनसाखळी प्रकरणी जेरबंद करण्यात आले. तर मोबाइल आणि पाकिटमारी करणाऱ्या ५ टोळ्यांनाही अटक केली आहे. या टोळ्या मुंबई आणि वर्धा येथून आल्या होत्या. त्यांच्याकडून ६० मोबाइल हस्तगत करण्यात आले आहेत. या टोळ्या विसर्जनाच्या एक दिवस अगोदरच शहरात दाखल झाल्या होत्या. यापैकी एक टोळी लॉजवर वास्तव्यास होती. विसर्जना दरम्यान फरासखाना पोलीस ठाण्यात मोबाइल, पाकिट आणि सोनसाखळी चोरीच्या ४१ तक्रारी दाखल झाल्या आहेत.

विसर्जन मिरवणुकीत मोबाइल चोरणाऱ्या १९ चोरट्यांना गुन्हे शाखेच्या युनिट २ च्या पथकाने पकडून त्यांच्याकडून ८२ मोबाइल जप्त केले होते.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त श्रीकांत तरवडे, पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, सहायक पोलीस आयुक्त प्रदीप आफळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर, पोलीस निरीक्षक नंदकिशोर शेळके, पोलीस उपनिरीक्षक यशपाल सूर्यवंशी, पोलीस कर्मचारी बापू खुटवड, सयाजी चव्हाण, केदार आढाव, अमर शिंदे, विशाल चौगुले, दिनेश भांदुर्गे, सचिन कुटे, सचिन सरपाले, मोहन दळवी, आकाश वाल्मीकी, अमेय रसाळ, मयूर भोकरे, पंकज देशमुख, राजू देवकर, अनिल गायकवाड यांच्या पथकाने केली.

लोकमत – दि. १९ सप्टेंबर, २०१९

# दुबईसह अनेक बँकांची फसवणूक करणारे तीन अटकेत

## अमेरिकन बँकेवरही घातला होता गंडा

पुणे : डेबिट कार्ड क्लोन करून कॉसमॉस बँकेची फसवणूक करणाऱ्या उत्तर प्रदेशातील तिघांना ठाणे पोलिसांनी अटक केली होती. त्यांना कॉसमॉस बँक सायबर दरोडाप्रकरणी सायबर पोलिसांनी ठाणे मध्यवर्ती कारागृहातून ताब्यात घेतले आहे. या तिघांनी अमेरिकन बँकांसह अनेक बँकांवर त्यांनी गंडा घातल्याचे निष्पन्न झाले आहे.


कॉसमॉस बँक सायबर दरोडा

शाबाज मोहंमद आरिफ खत्री ऊर्फ रेहान अली खान (वय ३०, रा. मुंब्रा, ठाणे), आसिफ जमिल शेख (वय ३१, रा. महावीरनगर, मुंब्रा, ठाणे), फिरोज यासिन शेख (वय ३७, रा. कॉटन ग्रीन, मुंबई) अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. कॉसमॉस बँकेच्या स्विफ्टचे क्लोन करून त्याद्वारे भारतासह २९ देशातून व्हिसा व रुपे कार्डद्वारे ९४ कोटी ४२ लाख रुपये काढून बँकेची फसवणूक केली होती. हे तिघेही जण आंतरराष्ट्रीय सायबर चोरट्यांशी संबंधित असून, त्यांनी यापूर्वीही अनेक बँकांना अशाच प्रकारे फसवून लाखो रुपये काढले आहेत. हे तिघेही दुबई येथे पळून गेलेल्या त्याच्या साथीदाराच्या मदतीने क्लोन डेबिट कार्ड तयार करून त्याद्वारे एटीएममधून पैसे काढून फसवणूक करीत होते. त्यांनी अमेरिकन बँकेसह अनेक बँकांना गंडा घातला असून, त्यासाठी ते किमान १० वेळा दुबईला गेल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. शाबाज याने राजस्थानमधील जयपूर येथील एटीएममधून ५ लाख रुपये काढले होते. आसिफ व फिरोज यांनी त्यांच्या दोघा साथीदारांच्या मदतीने इंदूरमधील एटीएममधून ५३ लाख ७२ हजार रुपये काढले होते. त्यांच्या दोघा साथीदारांना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे.

ही कामगिरी आर्थिक व सायबर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक जयराम पायगुडे यांच्या पथकाने केली.

**१** कॉसमॉस बँक सायबर दरोडा प्रकरणात यापूर्वी १५ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्यावर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत. या सर्वांनी प्रत्यक्ष एटीएममध्ये जाऊन क्लोन कार्डाच्या साहाय्याने पैसे काढले होते.

**२** ठाणे पोलिसांना या तिघांविषयी माहिती मिळाल्यावर त्यांनी तिघांना अटक केली होती. त्यांची पोलीस कोठडीची मुदत संपल्यावर त्यांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते. त्यानुसार सायबर पोलिसांनी कॉसमॉस फसवणुकीच्या गुन्ह्यात प्रॉडक्शन वॉरंटने ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले असता, तिघांनाही पोलीस कोठडी सुनावली आहे.

लोकमत – दि. १९ सप्टेंबर, २०१९

# दोन दिवसांत ३७५ कोयते जप्त

## तीन वर्षातील साडेपाचशे गुन्ह्यांत झाला वापर : चौघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सहजपणे उपलब्ध होणारी हत्यारे, त्यांचा बिनधास्तपणे होणारा वापर यामुळे सातत्याने शहरातील गुन्हेगारी वाढताना दिसत आहे. शहरात गेल्या तीन वर्षांत साडेपाचशे गुन्ह्यांत कोयत्याचा वापर झाला असून पोलिसांनी दोन दिवसांत पावणे चारशे कोयते जप्त करत चौघांना अटक केली आहे. होणारा हत्यारांचा सर्रास शहरातील वाहन तोडफोड आणि दहशत माजविण्यासाठी सर्रास कोयत्यांचा गुन्हेगार करत असल्याची बाब तपासातून समोर आली आहे.

याप्रकरणी जयसिंग शामराव पवार (वय ३४, रा. मंगळवार पेठ), महावीर ब्रिजलाल गुप्ता (वय ४५, रा. जुना बाजार झोपडपट्टी, मंगळवार पेठ), नितीन ज्ञानेश्वर नाईक व आशिष शांतीभूषण नाईक (रा. स्वारगेट) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यामुळे गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चन सिंह यांनी अवैधरित्या कोयते विकणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, खंडणीविरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र मोहिते व उपनिरीक्षक नीलेश महाडिक, कर्मचारी अविनाश मराठे, संदीप साबळे व त्यांच्या पथकाने शहरातील विविध भागात कोयते विक्री करणाऱ्या चौघांवर कारवाई केली आहे. त्यामुळे कोयते विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

यापूर्वी परिमंडळ एकचे तत्कालीन उपायुक्त सुहास बावचे यांनी जुना बाजार व विश्रामबाग परिसरातील कोयते विक्रेत्यांवर कारवाई केली होती. यानंतर जुना बाजारमधील विक्रीचे प्रमाण कमी झाले होते. स्वारगेट परिसरातील नाईक बी-बियाणे या दुकानात छापा टाकल्यानंतर पोलिसांनी तब्बल २२९ कोयते जप्त केले आहेत. तर, गुप्ता याच्या राज बकेट या दुकानात १३१ कोयते मिळाले आहेत.

### सत्तूर, कोयत्याचा होतोय सर्वाधिक वापर

शहरात खुनाचा प्रयत्न, जबर मारहाण या गुन्ह्यात कोयता व तलवारींचा वापर होत आहे. पोलिसांनी या गुन्ह्यातून जामिनावर बाहेर आलेल्यांकडे केलेल्या चौकशी केल्यानंतर बहुतांश गुन्ह्यात कोयता, चॉपर, सतुरांचा वापर होत असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी या गुन्ह्यातील तीन वर्षाची तपासणी केल्यानंतर त्यात ५४७ गुन्ह्यांत कोयत्याचा वापर झाला आहे.

लोकसत्ता – दि. ११ सप्टेंबर, २०१९

# महागडी घड्याळे लांबविणारी दिल्लीतील चोरट्यांची टोळी गजाआड

प्रतिनिधी, पुणे

## पुणे, मुंबई, दिल्लीतील मॉलमधील चोऱ्या उघड

**सेनापती बापट** रस्त्यावरील एका मॉलमधून पाच लाख रुपयांची चार मनगटी घड्याळे लांबवून पसार झालेल्या दिल्लीतील चोरट्यांच्या टोळीला गुन्हे शाखेने गजाआड केले. उत्तम वेशभूषा करून मॉलमध्ये ग्राहक असल्याच्या बहाण्याने या टोळीने महागड्या वस्तूंची चोरी केल्याचे उघडकीस आले असून या टोळीत दहा ते बाराजण आहेत.

आशिष कुशल बिश्त (वय ३०), आकाश बालकिसन ढाका (वय २६), रवींदरसिंग अमरजीतसिंग (वय ३२, तिघे रा. लोधी कॉलनी, नवी दिल्ली) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. गेल्या महिन्यात सेनापती बापट रस्त्यावरील एका मॉलमध्ये शिरलेल्या चोरट्यांनी परदेशी बनावटीची चार महागडी घड्याळे चोरून नेली होती. या प्रकरणी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह यांनी गुन्हे शाखेला या गुन्ह्याचा छडा लावण्याच्या सूचना दिल्या होत्या.

सीसीटीव्ही चित्रीकरणात चोरटे प्रवासी वाहतूक करणाऱ्या मोटारीतून मॉलमध्ये आल्याचे आढळून आले होते. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने प्रवासी वाहतूक सेवा पुरविणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांबरोबर संपर्क साधला आणि माहिती घेतली. तपासात चोरटे मंगळवार पेठ भागातील एका हॉटेलमध्ये वास्तव्यास असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांचे पथक तातडीने दिल्लीला रवाना झाले आणि तिघा चोरट्यांना ताब्यात घेतले. गुन्हे शाखेच्या युनिट चारचे पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, उपनिरीक्षक नीलेश महाडीक, सचिन ढवळे, शंकर संपते, शंकर पाटील, अशोक शेलार, राजू मचे यांनी ही कारवाई केली.

### दिल्लीत पाच दिवस पाळत

मॉलमध्ये चोरी करणारे दिल्लीतील असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेचे पथक पाच दिवस चोरट्यांवर पाळत ठेवून होते. लोधीबाग परिसरात वास्तव्यास असणारे चोरटे पकडले गेले. काही महिन्यांपूर्वी या टोळीने मुंबईतील लोअर परेल, दिल्ली, पुणे परिसरातील मॉलमधून खरेदीच्या बहाण्याने परदेशी कंपन्यांची वस्त्रप्रावरणे, महागडी घड्याळे तसेच अन्य वस्तूंची चोरी केल्याचे उघडकीस आले आहे.

# संगणक अभियंत्याचा गहाळ झालेला लॅपटॉप अर्ध्या तासात सापडला

## गुन्हे शाखेकडून तत्पर तपास

प्रतिनिधी, पुणे

**दुचाकीस्वार संगणक** अभियंत्याने लॅपटॉप, मोबाइल तसेच रोकड ठेवलेली पिशवी प्रवासादरम्यान गहाळ झाल्यानंतर गुन्हे शाखेने तत्परतेने तपास करून पिशवी परत केली. गहाळ झालेली पिशवी शिवाजीनगर भागात सापडली.

संगणक अभियंता शत्रुघ्न रॉय (वय ३७, रा. गंगा पॅरेडाइज, वाघोली) मूळचे झारखंडचे आहेत. बालेवाडी भागातील एका माहिती-तंत्रज्ञान कंपनीत ते काम करतात. मंगळवारी सकाळी ते दुचाकीवरून बालेवाडीला जात होते. प्रवासादरम्यान दुचाकीला लावलेली पिशवी गहाळ झाली.

या पिशवीत लॅपटॉप, २५०० रुपये, डेबिट, क्रेडिट कार्ड असा ऐवज होता. पिशवी गहाळ झाल्यानंतर रॉय यांनी पोलिसांकडे तक्रार केली. त्यानंतर गुन्हे शाखेच्या युनिट चारच्या पथकातील पोलीस कर्मचारी सचिन ढवळे यांनी तातडीने तपास सुरू केला.

तपासात रॉय यांची गहाळ झालेली पिशवी शिवाजीनगर भागात असल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांनी पिशवी शोधून काढली. रॉय यांना अर्ध्या तासात गहाळ झालेली पिशवी सापडल्याने त्यांनी पोलिसांचे आभार मानले. पोलीस निरीक्षक अंजुम बागवान आणि पथकाने ही कामगिरी केली.

# परराज्यातील चोरांची टोळी गजांआड

म. टा. प्रतिनिधी, हडपसर

हडपसर उड्डाणपुलाखाली गणेशोत्सवामुळे होणाऱ्या गर्दीचा फायदा घेऊन मोबाइल चोरणाऱ्या तीन चोरट्यांना हडपसर गजांआड केले असून, त्यांच्यावर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही टोळी परराज्यातील असून, त्यांच्यावर यापूर्वीही चार गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहेत. टोळीतील आणखी एक चोरटा फरारी झाला असून, हडपसर पोलिस त्याचा शोध घेत आहेत.



किरण हनुमंतअप्पा किकी (वय २२, रा. घोरपडी गाव, मूळ रा. भोईकलवाडी, कर्नाटक), मधू रामू गुंजाळ (१९. रा. धोबडवाडी, घोरपडी, मूळ रा. संतोषनगर, हैद्राबाद, आंध्र प्रदेश), राजू सीताराम राजन (३५, रा. धोबडवाडी, मूळ रा. नारकेटपल्ली, तेलंगण) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. गणेशोत्सवाच्या निमित्त हडपसर उड्डाणपुलाखाली सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी होते आहे. याचा फायदा घेऊन परराज्यातील चोरांची टोळी नागरिकांची दिशाभूल करून, मोबाइल चोरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी गस्त वाढवली व चोरट्यांवर लक्ष ठेवून, त्यांना मोबाइल चोरताना पकडले. त्यांच्याकडून ४३ मोबाइल व एक दुचाकी असा एक लाख ९३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक रघुनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील सहायक पोलिस निरीक्षक संजय चव्हाण, संपत औचारे, राजेश नवले, प्रताप गायकवाड, सौदाबा भोजराव, विनोद शिवले, गणेश दळवी, अनिल कुसाळकर, अकबर शेख, शशिकांत नाळे, गोविंद चिवळे, अमित कांबळे, ज्ञानेश्वर चित्ते व विजय पवार यांनी केली.



# पिस्तूलप्रकरणी दोघांना अटक

कात्रज : भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याच्या परिसरात बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्यासह त्याच्या साथीदाराला पोलिसांनी अटक केली आहे. गुजरवाडी फाटा येथे एक व्यक्ती उभा असून, त्याच्याकडे बेकायदा पिस्तूल आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून मनोहर रघुनाथ मांगडे (वय ४२) याला अटक केली. त्याच्याकडून पिस्तूल व जिवंत काडतुसे असा एकूण २५,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मनोहरने ते पिस्तूल जांभुळवाडी येथील मारुती घोरपडे (मु. पो. लासुर, ता. इंदापूर) यांच्याकडून खरेदी केल्याने पोलिसांनी त्यालाही अटक केली आहे.

मारुती घोरपडेवर कोथरूड व बारामती पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. मनोहर मांगडेवरही खुनाच्या प्रयत्नासारखे गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई स्वारगेट विभागाचे सहायक पोलिस आयुक्त मालोजीराव पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णू पवार, गुन्हे विभागाचे पोलिस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलिस उपनिरीक्षक सुबराव लाड, कर्मचारी कृष्णा बढे, कुंदन शिंदे, सर्फराज देशमुख, सचिन पवार, राहुल तांबे गणेश चिंचकर, अभिजित रत्नपारखी, महेश मंडलिक, अभिजित जाधव, योगेश सूळ यांनी केली.

**महाराष्ट्र टाइम्स – दि. ५ सप्टेंबर, २०१९**

# तंबाखूजन्य पदार्थ आणणाऱ्यांवर कारवाई

## शिवाजीनगर कोर्टात ४०० जणांची तपासणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शिवाजीनगर कोर्टात तंबाखूजन्य पदार्थ घेऊन येणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. मंगळवारी दिवसभरात पोलिसांनी ४०० लोकांची तपासणी करून, त्यांना सक्त ताकीद दिली. त्यांच्याकडील तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले आहेत. पोलिसांकडून ही कारवाई दर रोज करण्यात येणार आहे.

शिवाजीनगर कोर्टातील वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रभाकर ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक कविदास जांभळे, सहायक पोलिस फौजदार कमलाकर गायकवाड, गुंगा जगताप, पोलिस हवालदार सुनील शिंदे, पोलिस नाईक किशोर आव्हाड, पोलिस शिपाई मुरलीधर डांगे, स्नेहल टकले, पोलिस नाईक आशिष पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

शिवाजीनगर कोर्टाच्या आवारात आणि परिसरात नागरिकांकडून थाण केली जाते. कोर्टातील नव्या आणि जुन्या इमारतीतील भिंती तंबाखूजन्य पदार्थ खाऊन लाल करण्यात आल्या आहेत. त्यामुळे काही दिवसांपूर्वी न्यायालयातील परिसर स्वच्छ राहावा, यासाठी तरुण वकिलांनी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती व प्रमुख जिल्हा न्यायाधीशांना निवेदन देऊन, कोर्टात थुंकून घाण करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस. बी. अग्रवाल यांनी परिपत्रक काढून, कोर्टाच्या आवारात थुंकणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले. कोर्टाच्या आवारात थुंकल्यास दोन हजार रुपये दंड किंवा तीन महिने कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. शिवाजीनगर कोर्टातील पोलिस कर्मचाऱ्यांनी धडक कारवाई सुरू केली असून, कोर्टातील सर्व प्रवेशद्वारांवर कोर्टात येणाऱ्या लोकांची तपासणी करण्यात येणार आहे. त्यांच्याकडील तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात येत आहेत.

**महाराष्ट्र टाइम्स – दि. १४ सप्टेंबर, २०१९**

# चोरांची टोळी अटकेत; ८२ मोबाइल जप्त

पुणे : विसर्जन मिरवणुकीत मोबाइल चोरणाऱ्या टोळीतील १९ जणांस गुन्हे शाखा युनिट दोनने अटक केली आहे. त्यांच्याकडून वेगवेगळ्या कंपन्यांचे सात लाख रुपये किंमतीचे महागडे ८२ मोबाइल जप्त करण्यात आले आहेत. हे टोळके नांदेड व मालेगाव परिसरातून मोबाइल चोरण्यासाठी खासगी वाहने करून पुण्यात आल्याचे समोर आले.

मोबाइल चोरणाऱ्या टोळीवर नजर ठेवण्यासाठी गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चनसिंग यांनी पथके तैनात केली होती. युनिट दोनचे निरीक्षक गजानन पवार हे डेंगळे पुलाजवळ गस्त घालत असताना नदीपात्रात चार संशयित आढळून आले. चौकशी केल्यानंतर ते मालेगाव व नांदेड परिसरातून गणेश उत्सव पाहण्यासाठी आल्याचे सांगितले. झडती घेतल्यावर त्यांच्याकडे १८ मोबाइल आढळले. चौकशी केल्यानंतर त्यांनी दगडूशेठ गणपती, शिवाजी रस्ता परिसरात गर्दीत मोबाइल चोरल्याची; तसेच आपले १४ ते १५ साथीदार असल्याची माहिती पोलिसांना दिली. ते ग्रुपने वेगवेगळ्या भागांत मोबाइल चोऱ्या करत असल्याचे सांगितले. त्यानुसार पुणे रेल्वे स्टेशन, मालधक्का, ढुवे पार्क, शिवाजीनगर अशा वेगवेगळ्या ठिकाणांहून १५ जणांना ताब्यात घेण्यात आले.

### यंदा पाचशे तक्रारी

मिरवणुकीमध्ये फरासखाना आणि विश्रामबाग परिसरातील पोलिस ठाण्याच्या हद्दीत चारशे ते पाचशे मोबाइल चोरीचे प्रकार समोर आले आहेत. या वर्षी रात्री उशिरापर्यंत पाचशेपेक्षा जास्त मोबाइल चोरीच्या तक्रारी आल्याचे पोलिसांनी सांगितले.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १५ सप्टेंबर, २०१९

क्राइम डायरी

# मोबाइल चोरणाऱ्या टोळ्या अटकेत

## सहा टोळ्यांकडून चार आयफोन व ६० मोबाइल जप्त

म. टा. प्रतिनिधी, पुणे

गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये गर्दीत नागरिकांचे मोबाइल चोरण्यासाठी खास वर्धा, मुंबई परिसरातून आलेल्या सहा टोळ्यांना फरासखाना पोलिसांनी अटक केल्या आहेत. या सहा टोळ्यांमध्ये १५ जण असून, त्यांच्याकडून चार आयफोन व इतर ६० मोबाइल असा एकूण सात लाख ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर, गर्दीत सोनसाखळी व इतर मौल्यवान ऐवज चोरणाऱ्या हरियाणा येथील महिलांच्या टोळीला पकडण्यात आले आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीत नागरिकांचे मोबाइल, सोनसाखळी आणि पाकिटांवर डल्ला मारण्यासाठी इतर शहरांबरोबरच परराज्यातील टोळ्या दाखल झाल्या होत्या. गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये मोबाइल, पाकीट आणि सोनसाखळी अशा किमती ऐवजाची चोरी करण्यासाठी खास आंध्र प्रदेश, कर्नाटक, हरियाणासारख्या राज्यातून चोरांच्या टोळ्या शहरात दाखल होतात, याची माहिती पोलिसांना होती. गेल्या वर्षी विसर्जन मिरवणुकीत चोऱ्या करणाऱ्या टोळ्या पकडण्यात आल्या होत्या. त्यासाठी स्थानिक पोलिसांबरोबरच गुन्हे शाखेची पथके साध्या वेशात तैनात करण्यात आली होती. तसेच, सीसीटीव्हीवरून देखील चोरट्यांवर लक्ष ठेवण्यात आले होते. त्यानुसार गुन्हे शाखेने १९ जणांच्या टोळीस पकडून ८२ मोबाइल जप्त केले आहेत.

फरासखाना पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जगन्नाथ कळसकर यांनी त्यांच्या तपास पथकाला मोबाइल चोरांवर विशेष लक्ष्य ठेवण्यास सांगितले होते. त्यानुसार उपनिरीक्षक यशपाल सूर्यवंशी, बापू खुटवड, मयूर भोकरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी वेगवेगळ्या ठिकाणाहून सहा टोळ्यांना पकडले. या टोळ्यात १५ जणांचा सहभाग असून, त्यांच्याकडून ६४ मोबाइल जप्त करण्यात आले आहे. या टोळ्यातील आरोपी मुंबई, वर्धा परिसरातून खास मोबाइल चोरण्यासाठी आल्याचे आढळून आले आहे. गर्दीत शिरून नागरिकांच्या खिशातील मोबाइल चोरायचे आणि दुसऱ्या साथीदाराकडे तत्काळ द्यायचे, अशी पद्धत आरोपींची होती.

याबाबत वरिष्ठ निरीक्षक जगनाथ कळसकर यांनी सांगितले, की फरासखाना पोलिसांनी सीसीटीव्ही व पोलिसांची पथके तयार करून गुन्हेगारांवर लक्ष ठेवले होते. यामध्ये हरियाणा येथील एका महिलांच्या टोळीला सोनसाखळीप्रकरणी जेरबंद करण्यात आले. तर मोबाइल आणि पाकिटमारी करणाऱ्या टोळ्यांनाही अटक केली आहे. या टोळ्या मुंबई आणी वर्धा येथून आल्या होत्या. त्यांच्याकडून ६४ मोबाइल हस्तगत करण्यात आले आहेत. या टोळ्या विसर्जनाच्या एक दिवस अगोदरच शहरात दाखल झाल्या होत्या. यापैकी एक टोळी लॉजवर वास्तव्यास होती. विसर्जनादरम्यान फरासखाना पोलिस ठाण्यात मोबाइल, पाकीट आणि सोनसाखळी चोरीच्या ४१ तक्रारी दाखल झाल्या आहेत.



### महिलांची टोळी अटकेत

फरासखाना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजवरून बेलबाग चौकात संशयितपणे फिरणाऱ्या सहा महिलांच्या एका टोळीला ताब्यात घेतले. त्या महिलांनी गर्दीत सोनसाखळी चोरीचे गुन्हे केल्याचे समोर आले आहे. या महिला मुळच्या हरियाणा येथील असून, दिल्लीतून रेल्वेने विसर्जनाच्या आदल्या दिवशी पुण्यात दाखल झाल्या होत्या. त्या खास सोनसाखळी चोरण्यासाठी आल्या होत्या. या सर्वजणी परस्परांच्या नातेवाइक असून, त्यांनी काही गुन्हे केल्याची कबुली दिली आहे, अशी माहिती फरासखाना पोलिसांनी दिली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २० सप्टेंबर, २०१९

# अखेर 'बुलेट राजा' पोलिसांच्या ताब्यात

## घरफोडीपूर्वी 'बुलेट'वर फिरून करत होता रेकी

पुणे : दिवसा बुलेटवरून परिसरातील बंद घरांची 'रेकी' करून रात्री घरफोडी करणाऱ्या बुलेट राज्याच्या गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने मुसक्या आवळल्या आहेत. गजानन अर्जुन पाटील (वय २५, रा. गवळी वाडा, वडगाव शेरी, मूळ रा. जामनेर, जि. जळगाव) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्याकडून गुन्ह्यातील सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, गुन्ह्यात वापरलेली बुलेटही ताब्यात घेण्यात आली आहे.

पुणे शहरामध्ये बुलेटवरून फिरून बंद घरातील किंमती वस्तूवर डल्ला मारणाऱ्या 'बुलेट राजा'ला पोलिसांनी 'सीसीटीव्ही'च्या मदतीने गजांआड केले आहे. गजानन पाटील याने चंदननगर पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये घरफोडी केली होती. गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी परिसरातील ६० ते ७० 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. त्या वेळी बुलेटवरून परिसरात फिरणाऱ्या व्यक्तीचा संशय आल्याने पोलिसांनी त्याचा तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोध घेतला.

गुन्हा केल्यानंतर आरोपी मूळ गावी जामनेर येथे गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पथकाने जामनेर येथे जाऊन शोध घेतला असता तो संगमनेर येथे असल्याचे उघड झाले. गुन्हेशाखेने संगमनेर येथे सापळा रचून, आरोपीला ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. सहायक निरीक्षक गणेश पवार, फौजदार विजय झंजाड, कर्मचारी अशोक शेलार, सागर घोरपडे, जितेंद्र तुपे, सुरेंद्र साबळे, सचिन ढवळे, शंकर संपते, शंकर पाटील, शीतल शिंदे, अतुल मेंगे, भालचंद्र बोरकर, सुहास कदम, राकेश खुनवे, हनुमंत बोराटे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २१ सप्टेंबर, २०१९

# व्यापाऱ्याला खंडणी मागणारा अटकेत

पुणे : कपडे विक्री करणाऱ्या दुकानदाराकडे हप्त्याच्या स्वरूपात खंडणीची मागणी करणाऱ्याला हडपसर पोलिसांनी अटक केली आहे. माळवाडी परिसरात डी. पी. रोडवरील एका दुकानात बुधवारी (१८ सप्टेंबर) सायंकाळी साडेपाच वाजता हा प्रकार घडला.

सूरज अटोळे (वय २१, रा. गोसावी वस्ती, हडपसर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. त्याच्या विरोधात रामटेकडी परिसरात राहणाऱ्या ३३ वर्षीय दुकानदाराने फिर्याद दिली. त्यानुसार हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराचे ओरिएंट पार्क इमारतीत कपडे विक्रीचे दुकान आहे. बुधवारी सायंकाळी साडेपाच वाजता ते दुकानातील कामगारासह हजर असताना आरोपी अटोळे दुकानात आला. त्याने शिवीगाळ केली; तसेच दुकान चालवायचे असेल, तर प्रत्येक महिन्याला ४० हजार रुपये हप्ता द्यावा लागेल, असे धमकावून खंडणीची मागणी केली. पैसे दिले नाही, तर जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर हडपसर पोलिसांनी आटोळे याला अटक केली. सहायक निरीक्षक एम. डी. पाटील तपास करीत आहेत.

# शिक्षकाचा खून करणाऱ्याला अटक

## बीड येथील प्रकरणात हडपसर पोलिसांची कारवाई




म. टा. प्रतिनिधी, हडपसर

बीड येथील शिक्षकाचा धारदार शस्त्राने खून करून हडपसरमधील सय्यदनगर येथे लपलेल्या मुख्य आरोपीला हडपसर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. या प्रकरणातील इतर आरोपींना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. हडपसर पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीला बीड पोलिसांच्या ताब्यात दिले.

अमर अकबर शेख (वय ३०, रा. वालेपीर, ता. जि. बीड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. हडपसर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक हमराज कुंभार यांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ सप्टेंबरला केंद्रीय विद्यालयाचे शिक्षक सय्यद साजिद आली यांचा धारदार शस्त्राने खून करून आरोपी पसार झाले होते. यामधील मुख्य चार आरोपींपैकी अमर अकबर शेख पोलिसांना सापडत नव्हता. खून झालेले साजिद आली सय्यद हे सामाजिक कार्यकर्तेही होते. बीड पोलिस आरोपीचा शोध घेत होते.

आरोपी अमर शेखच्या डाव्या पायाला पोटऱ्याजवळ जखम असून, तो हडपसर हद्दीतील सय्यदनगरला लपून बसल्याची खात्रीशीर माहिती हडपसर पोलिस ठाण्याचे पोलिस शिपाई नितीन मुंढे आणि शाहीद शेख यांना मिळाली होती. त्यानुसार मुंढे व शाहीद शेख त्याच्यावर लक्ष ठेवून होते. सोमवारी आरोपी अमर शेख काळेपडळ रेल्वे गेटजवळ येत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. त्या वेळी पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली. आरोपी अमर शेख हा सराईत गुन्हेगार आहे.



# 'त्या' रिक्षाचालकाला कात्रजमध्ये पकडले

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बेंगळुरू येथून आलेल्या एका प्रवाशाला कात्रज भागातून येरवड्यात सोडण्यासाठी तब्बल ४,३०० रुपये भाडे आकारणाऱ्या रिक्षाचालकाला वाहतूक पोलिसांनी कात्रज भागात पकडले. त्याला पुढील कारवाईसाठी येरवडा पोलिसांकडे दिले आहे.


कात्रज ते येरवडा रिक्षाभाडे ₹ ४३००!

सचिन नामदेव अजंठराव (वय ४०, रा. संतोषनगर, कात्रज) असे अटक केलेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे. या प्रकरणी एका व्यक्तीने तक्रार दिली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बेंगळुरूहून एका खासगी प्रवासी बसने एक प्रवासी पुण्यात आला. कात्रज भागात बुधवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास तो रिक्षाची वाट पाहत थांबला होता. रिक्षाचालकाने या प्रवाशाला येरवडा भागात सोडले. त्यानंतर रिक्षाचालकाने प्रवाशाला दमदाटी करून कात्रज ते येरवडा दरम्यानच्या प्रवासापोटी ४,३०० रुपये भाडे आकारले.

घाबरलेल्या प्रवाशाने त्या रिक्षाचालकाला पैसे दिले. त्यानंतर प्रवाशाने येरवडा पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दिला. रिक्षाचालकाचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत होता. भारती विद्यापीठ वाहतूक शाखेतील पोलिस हवालदार नरेंद्र पारखी कात्रज भागात वाहतुकीचे नियमन करत होते. प्रवाशाला धमकावून अवाजवी भाडे आकारणारा रिक्षाचालक कात्रज भागातील असल्याची माहिती मिळाल्यानंतर वाहतूक विभागातील पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय धुमाळ, नरेंद्र पारखी, भिवा वाघमारे यांनी रिक्षाचालक अजंठरावला ताब्यात घेतले. त्याला येरवडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे, अशी माहिती वाहतूक शाखेकडून देण्यात आली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २८ सप्टेंबर, २०१९

# इंजिनीअरला लुटणाऱ्यांना अटक

## येरवडा पोलिसांची कारवाई; मुद्देमालही केला जप्त

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

पाऊस सुरू असल्याने आडोशासाठी हॉटेलच्या शेडमध्ये थांबलेल्या आयटी इंजिनीअरशी वाद घालून गळ्यातील तीन तोळ्यांची सोन्याची चेन हिसकावून नेण्याचा प्रकार समोर आला आहे. गेल्या काही दिवसांपासून येरवडा परिसरात 'स्ट्रीट क्राइम'च्या घटना वाढत असल्याने रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे.

आशिष राजन महाडिक (वय २९, रा. पंतनगर, चिखली) याने या प्रकरणी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी सागर संतोष माने (वय १९), रोहित राम कांबळे (वय १९) आणि दिनेश नीळू राठोड (वय ३५, सर्वजण रा. येरवडा) यांना अटक केली असून, त्यांच्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विमाननगर येथील एका आयटी कंपनीत फिर्यादी महाडिक नोकरीला आहेत. मंगळवारी कार्यालयातील काम आटोपून ते दुचाकीवरून घरी जात असताना रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास जोरदार पाऊस आला. त्यामुळे महाडिक यांनी सादलबाबा चौकातील हॉटेल अक्षयसमोर दुचाकी उभी केली आणि हॉटेलच्या शेडमध्ये थांबले. या वेळी तीन तरुण शेडमध्ये आले. त्यांनी महाडिक याला तू चोर आहेस, चोरी करतो काय? असे बोलून त्यांच्याशी वाद घालू लागले. मात्र, पाऊस चालू असल्याने शेडमध्ये थांबलो असल्याचे त्यांनी तरुणांना सांगितले. त्यावर एकाने महाडिक यांच्या शर्टची कॉलर पकडली आणि दुसऱ्या एकाने गळ्यातील सोन्याची चेन हिसकवून पळ काढला होता.

सहायक निरीक्षक बलभीम ननवरे, सहायक फौजदार बाळासाहेब बहिरट, कर्मचारी हणमंत जाधव, नागेश कुंवर, अशोक गवळी, नवनाथ मोहिते आणि पंकज मुसळे यांनी ही कारवाई केली.

> सादलबाबा चौकात रस्त्याच्या कडेला थांबलेल्या आयटी इंजिनीअरची सोन्याची चेन हिसकावून पळून गेलेल्या तीन आरोपींना लक्ष्मीनगर परिसरातून अटक करण्यात आली असून, आरोपींकडून चेन जप्त केली आहे.
>
> – बलभीम ननवरे,
> सहायक निरीक्षक, येरवडा

महाराष्ट्र टाइम्स – दि. २९ सप्टेंबर, २०१९

# नातवानेच केला आजीचा खून

## पैशाच्या वादातून कृत्य; आरोपी अटकेत

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

पैशाच्या वादातून बावीस वर्षीय नातवानेच आजीचा उशीने तोंड दाबून खून केल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. खून केल्यानंतर नातू हिमाचल प्रदेशला पळून गेला होता. पण तेथे एका चोरीच्या गुन्ह्यात हिमाचल प्रदेश पोलिसांनी त्याला अटक केली असून, कायदेशीर सोपस्कार पूर्ण केल्यावर येरवडा पोलिसांना त्याचा ताबा देण्यात येईल.

ओशम संजय गौतम (वय २२, रा. हिमाचल प्रदेश) असे खून करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. चांदणी चौहान (वय ६७, रा. सनशाइन सोसायटी, कल्याणीनगर) असे खून झालेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे. या प्रकरणी मनीष आनंद पिंपुटकर (वय ४३, रा. शिवाजीनगर) यांनी फिर्याद दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चांदणी चौहान यांच्या मुलीचा ओशम हा मुलगा आहे. ओशम पाच वर्षांचा असताना त्याच्या आईचा विमान दुर्घटनेत अपघाती मृत्यू झाला होता. ओशम जस जसा मोठा होत गेला, तसा तो व्यसनाधीन झाला. आईच्या मृत्यूनंतर मिळणाऱ्या पैशांवरून त्यांच्यात वाद सुरु झाले. याबाबत चांदणी यांनी आपल्या मुंबईत राहणाऱ्या भावाकडे ओशमची तक्रार केली होती. यादरम्यान, ओशम हिमाचल प्रदेशमध्ये मित्रासोबत राहत असताना त्याची दुचाकी आणि एटीएम कार्ड चोरून पळून गेला होता. मित्राच्या खात्यामधून त्याने दीड लाख रुपये काढले. त्यानंतर काही दिवसांनी तो पुण्यात आजीकडे आला. येथे पुन्हा त्यांच्यात पैशावरून भांडणे झाली. त्यामुळे ओशमने उशीने आजीचे तोंड दाबून खून केला. खून केल्यावर घरातील पैसे आणि काही दागिने चोरून पुन्हा हिमाचल प्रदेशला पळून गेला. मुंबईतील नातेवाइक वारंवार चांदणी यांना संपर्क करीत होते. पण संपर्क होत नसल्याने पुण्यातील त्यांचे मित्र मनीष पिंपुटकर यांना कल्याणीनगरला जाण्यास सांगितले. पिंपुटकर गुरुवारी रात्री कल्याणीनगरला गेल्यावर त्यांच्या फ्लॅटमधून दुर्गंधी येत असल्याचे समजल्यावर पोलिसांना माहिती कळविण्यात आली. पोलिसांनी फ्लॅटचे दार तोडल्यावर चौहान यांचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह सापडून आला. पोलिसांनी सखोल चौकशी सुरू केल्यावर ओशमचे नाव पुढे आले.

### व्यसनासाठी पैसे देत नसल्याने कृत्य

चांदणी चौहान यांच्या मुलीचा ओशम मुलगा आहे. ओशम पाच वर्षांचा असताना त्याच्या आईचा विमान दुर्घटनेत अपघाती मृत्यू झाला होता. कालांतराने सरकारकडून अपघातात मृत्यू झालेल्या नागरिकांना आर्थिक मदत मिळाली होती. पण ओशम लहान असल्याने मिळालेली आर्थिक मदत बँकेत फिक्स डिपॉझिट करण्यात आली होती. ओशमला अठरा वर्षे पूर्ण होईपर्यंत आजी चांदणी चौहान या वारसदार होत्या. ओशम जस जसा मोठा होत गेला, तसा तो व्यसनाधीन झाला. त्यामुळे आईच्या मृत्यूनंतर मिळणाऱ्या पैशांवरून वाद सुरू झाले. व्यसनासाठी पैसे मिळत नसल्याने ओशमने अनेकदा आजीशी भांडणे करून वाद घातला होता. यातून त्याने आजीचा खून केल्याचे समोर आले आहे.

> पैशाच्या वादातून चांदणी चौहान यांचा नातू ओशम गौतम याने उशीने तोंड दाबून खून केल्याचे समोर आले आहे. हिमाचल प्रदेश पोलिसांनी त्याला एका गुन्ह्यात अटक केली आहे. कायदेशीर प्रक्रिया आणि कागदपत्रांचा सोपस्कार पूर्ण करून त्याला पुण्यात आणले जाईल.
>
> – युनूस शेख, वरिष्ठ निरीक्षक, येरवडा पोलिस ठाणे

# सोनसाखळी चोरणारे दोघे जेरबंद

## येरवडा पोलिसांची कामगिरी : आठ चोरीचे गुन्हे उघडकीस

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १ -** येरवडा पोलिसांनी दोघा सोनसाखळी चोरांना ताब्यात घेऊन तीन लाख पाच हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. त्यांच्या तपासात येरवडा पोलीस ठाण्यात दाखल असलेले आठ सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

फिर्यादी सपना कोठारी यांचे गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र ६ ऑगस्ट रोजी अज्ञात इसमाने जबरदस्तीने चोरून नेल्याचा गुन्हा येरवडा पोलीस ठाण्यात दाखल झाला होता. याचा तपास करताना


**३ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त**



पोलीस उपनिरीक्षक मंगेश भांगे यांना मिळालेल्या माहितीवरून आरोपी शकील शब्बीर शेख ऊर्फ काकड्या ( वय २०), समीर शब्बीर शेख ( वय २२, दोघे राहणार साठे वस्ती लोहगाव) यांना अटक करण्यात आले. त्यांच्याकडे तपास करता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान त्यांनी सदर गुन्ह्या व्यतिरिक्त येरवडा भागात आणखीन गुन्हे केल्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून तपासा दरम्यान चोरीच्या ५ दुचाकी, १ चांदीची चेन, १ सोन्याचे मंगळसूत्र, २ चोरीचे मोबाइल, ५ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ३, ०५, ००० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

प्रभात – दि. २२ सप्टेंबर, २०१९

# तरुणीस अश्लिल मेसेज पाठवणारा जेरबंद



पुणे, दि. २१ - महाविद्यालयीन तरुणीस अश्लिल मेसेज पाठवणाऱ्यास समर्थ पोलिसांनी राजकोट येथून जेरबंद केले.

संदीप सुखदेव हजारे (२९, रा. बेदीपुरा, राजकोट, गुजरात) असे अटक आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी एका १९ वर्षीय तरुणीने फिर्याद दिली होती. फिर्यादी तरुणी एका अभियांत्रीकी महाविद्यालयात शिक्षण घेते. तिच्या मोबाइल क्रमांकावर असलेल्या व्हॉटस अॅप तसेच फेसबुकवर संदीप हा सातत्याने चॅटींग करत होता. तिचे फोटो व्हॉटस अॅप प्रोफाईलवर पाठवून 'तुझ्यावर प्रेम करतो' असे मेसेज पाठवत होता. काही दिवसानंतर त्याने तिला अश्लिल मेसेज पाठवण्यास सुरवात केली. त्याच्या मेसेजला वैतागून संबंधित तरुणीने समर्थ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी मेसेज येत असलेला मोबाइल क्रमांकाची माहिती काढली असता तो एका महिलेच्या नावावर रजिस्टर असल्याचे पुढे आले. या महिलेकडे तपास केला असता, तीने मोबाइल आपला पती वापरत असल्याचे सांगितले. तपासात तो राजकोट येथे केटरींगचे काम करत असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर कापुरे, पोलीस हवालदार राजस शेख, पोलीस शिपाई अनिल शिंदे, साहिल शेख, गणेश कोळी, प्रमोद टिळेकर, निलेश साबळे, स्वप्निल वाघुले, गणेश शेंडे यांनी तांत्रीक तपास करत त्याचा राजकोट येथून ताब्यात घेतले. त्याला पोलीस निरीक्षक विनायक साळुंके यांच्यासमोर हजर केले. त्याच्याविरुद्ध कराड तालुका पोलीस स्टेशन येथेही एका महिलेला अश्लिल मेसेज पाठवल्याचा गुन्हा दाखल आहे.

प्रभात – दि. २२ सप्टेंबर, २०१९

# सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे घरफोडी करणारा जेरबंद



पुणे, दि. २१ - सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारास युनिट चारच्या पथकाकडून जेरबंद केले. त्याच्यावर चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्याने २ लाख १० हजारांचा ऐवज चोरला. हा ऐवज आणि गुन्ह्यात वापरलेली बुलेट ताब्यात घेतली.

गजानन अर्जुन पाटील (२५, रा. गवळी वाडा, वडगाव शेरी) असे अटक केलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात एका महिलेने फिर्याद नोंदवली होती. फिर्यादी महिला व पती दोघेही नेहमीप्रमाणे कामावर गेले होते. संध्याकाळी घरी परतल्यावर त्यांना घराचा दरवाजा उघडा दिसला. त्यांनी घरात जाऊन पहाणी केली असता कपाटातील ७८ ग्रॅम सोन्याचे दागिने ज्यांची किंमत २ लाख १० हजार इतकी होती, ते चोरीला गेल्याचे आढळले. अप्पर पोलीस आयुक्त अशोक मोराळे आणि उपायुक्त गुन्हे बच्चन सिंग यांनी गुन्ह्याच्या ठिकाणी भेट देऊन युनिट चारच्या पथकास समांतर तपास करण्याचे आदेश दिले. त्यानुसार युनिट चारकडील पोलीस कर्मचारी अशोक शेलार, सागर घोरपडे, सुरेंद्र साबळे हे वडगाव शेरी, चंदननगर परिसरातील फिर्यादी यांच्या घराच्या परिसरातील खासगी सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करत होते. यावेळी त्यांना सीसीटीव्हीत बुलेटवरील एक संशयीत व्यक्ती आढळला. दरम्यान, तो वडगाव शेरी परिसरात फिरत असल्याची माहिती मिळाली. यानंतर तांत्रीक तपासात अर्जुन पाटीलचे नाव उघड झाले. त्याचा शोध घेऊन त्याला पकडण्यात आले.

प्रभात – दि. २२ सप्टेंबर, २०१९

# तब्बल १० लाख रुपयांचे कोकेन जप्त

## पुन्हा नायजेरियन कनेक्शन उघड : कोंढवा परिसरात कारवाई, तस्कर ताब्यात

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २१ - कोकेन विक्रीसाठी फिरणाऱ्या नायजेरियन नागरिकास गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथक (पश्चिम)ने कोंढवा परिसरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडून १० लाख रुपये किंमतीचे २०० ग्रॅम कोकेन जप्त केले.

उबा सेवीयर गॉडविन (३१, रा. पिसोळी, मुळ रा. नायजेरिया) असे पकडलेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. नायजेरियन नागरिक अंमली पदार्थ विक्रीसाठी कोंढवा परिसरात फिरत असल्याची माहिती बातमीदाराकडून पोलीस उपनिरीक्षक महाडिक आणि त्यांच्या पथकास मिळाली. त्यानुसार कोंढवा भागात सापळा रचला. तसेच, ब्रह्मा अवेन्यू सोसायटीसमोर संशयावरून एका नायजेरियन व्यक्तीस ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेत त्याचे पाठीवर असणाऱ्या सॅकमध्ये तपासणी केली असता २०० ग्रॅम कोकेन जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत १० लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तसेच मोबाइल, १ लाख ८४ हजार १९० रुपये, दुचाकी असा एकूण १२ लाख १५ हजार ४९० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. अपर पो.आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, सहायक आयुक्त शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाचे राजेंद्र मोहिते, उपनिरीक्षक महाडिक, कर्मचारी प्रसाद मोकाशी, रमेश गरुड, महेश कदम, पांडुरंग वांजळे, उदय काळभोर, अमोल पिलाने, प्रवीण पडवळ, संदीप साबळे, सचिन कोकरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.



**पुढारी** – दि. ६ सप्टेंबर, २०१९

# गर्दीचा फायदा घेत चोरी करणाऱ्या दोघींना दामिनी पथकाने पकडले

**पुणे : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या कालावधीत गर्दीचा फायदा घेत महिलांच्या बॅगेतील किमती ऐवजावर डल्ला मारणाऱ्या दोन महिलांना दामिनी पथकाच्या मार्शलनी पकडले आहे.

कसबा पेठेतील गणपती स्टॉलवर खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या हातातील पिशवी ब्लेडने कापून चोरी करणाऱ्या संशयित महिला असल्याचा कॉल पोलिस नियंत्रण कक्षाला सोमवारी दुपारी अडीच वाजता मिळाला होता. त्यानुसार दामिनी नरके व वडमारे या तातडीने घटनास्थळी पोहचल्या. त्यांनी तेथे चौकशी केल्यावर एका महिलेने आपली हँड बॅग ब्लेडने कापून तिच्यातील छोटी पर्स चोरून नेली असल्याचे सांगितले. पथकातील महिलांनी यशोधा सुनील भगवाने (वय ५०) याला महिलेला पकडून विश्रामबाग पोलिसांच्या ताब्यात दिले.

दुसरीकडे दामिनी मार्शल आत्राम, मुंडे, चलेकर, शेख या तुळशीबागेत मंगळवारी पायी गस्तीवर असताना एका महिला संशयास्पदरीत्या फिरताना दिसून आली. त्यांनी या महिलेकडे चौकशी केल्यावर तिने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. आसमा मुजाहेद सय्यदा (वय ३३, रा. धनगरवाडा, पैठण, औरंगाबाद) असे तिचे नाव आहे. तिला विश्रामबाग पोलिस ठाण्यात आणल्यावर पोलिसांनी तिची झडती घेतली. तिच्याकडील कापडी पिशवी ५ हजार ९०० रुपये, मोबाईल व छोटा कटर मिळून आले. तिच्याकडे अधिक चौकशी केली असता तिने चोरी केल्याची कबुली दिली.

**प्रभात** – दि. २५ सप्टेंबर, २०१९

# फरारी असलेला गुन्हेगार अटकेत

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २४-** दरोड्याच्या गुन्ह्यात २२ वर्षे फरार असलेल्या गुन्हेगारास गुन्हे शाखेने अटक केली. त्याने २२ ऑगस्ट १९९७ रोजी एका सराफी दुकानावर दरोडा टाकून ४० लाखांचा ऐवज लुटला होता.

विलास ऊर्फ अविनाश विश्वनाथ भालेराव ( वय ४८, रा.सणसवाडी. ता. बीड) असे अटक आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी येरवडा येथील अंबिका ज्वेलर्सचे रतनचंद जैन (येरवडा) यांनी फिर्याद दिली होती. काश्मीरी कॉलनीतील अंबिका ज्वेलर्स दुकानाच्या मागेच फिर्यादी राहत होते. त्यांना आरोपींनी घराबाहेर बोलावून तलवार आणि रिव्हॉल्वर डोक्याला लावून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यांनतर मारहाण करून रात्री दुकान उघडण्यास भाग पाडले. त्यांनंतर दुकानातील रोख रक्कम आणि दीड किलो सोन्याचे दागिने चोरून नेले या गुन्ह्याचा तपास करताना संतोष लक्ष्मण ओव्हाळ, राजेंद्र मामाजी नाडर, रामभाऊ विश्वनाथ सूर्यवंशी तसेच चोरीचे सोने घेणाऱ्या दोन सोनारांना अटक करण्यात आली होती. गुन्ह्याचे दोषारोपपत्रही न्यायालयात दाखल करण्यात आले होते. गुन्हा केल्यानंतर आरोपी विलास हा फरार झाला होता. दरम्यान, न्यायालयाने निकाल देऊन चौघांना सात वर्षांची शिक्षाही दिली. गुन्हे शाखेकडून फरार व वॉंटेड गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक स्थापन करण्यात आले आहे. त्यांना विलास हा शिरूर तालुक्यातील सणसवाडी येथे राहत असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील महेश निंबाळकर, संभाजी नाईक, राजकुमार पाटील यांनी सणसवाडी येथे सापळा रचून त्याला अटक केली. ही कारवाई अप्पर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त बच्चन सिंग, सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.

पुढारी – दि. ४ सप्टेंबर, २०१९

### शिवाजीनगर कोर्टाच्या गेटवर तीनशेपेक्षा जास्त जणांकडून तंबाखूजन्य पदार्थ जप्त

# व्यसनबाजांना न्यायदेवतेच्या दारातच दणका

## गुटखा, तंबाखू बाळगणाऱ्यांवर कारवाई

**पुणे : प्रतिनिधी**

तंबाखूजन्य पदार्थ घेऊन न्यायालयाच्या आवारामध्ये प्रवेश करणाऱ्या व्यसनबाजांवर शिवाजीनगर जिल्हा न्यायालयातील पोलिसांनी कारवाई करत, न्यायालयाच्या दारातच त्यांना दणका दिला आहे. मंगळवारी दिवसभरात पोलिसांनी न्यायालयाच्या गेट नंबर चार येथे सुमारे ७०० जणांची तपासणी करून तीनशेहून अधिक जणांकडून तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले. न्यायालयामध्ये येताना पुन्हा हे पदार्थ घेऊन न येण्याची सक्त ताकीद देऊन त्यांना सोडून दिले.

शिवाजीनगर जिल्हा न्यायालयातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रभाकर ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक कविदास जांभळे, सहाय्यक पोलीस फौजदार कमलाकर गायकवाड, गुंगा जगताप, पोलीस हवालदार सुनील शिंदे, पोलीस नाईक किशोर आव्हाड, पोलीस शिपाई मुरलीधर डांगे, स्नेहल टकले, पोलीस नाईक आशिष पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

शिवाजीनगर जिल्हा न्यायालयामध्ये अस्वच्छता मोठ्या प्रमाणावर पसरली आहे. न्यायालयाच्या नव्या आणि जुन्या इमारतीमधील भिंती तंबाखूजन्य पदार्थ खाऊन, थुंकून लाल केल्या आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपूर्वी न्यायालयातील परिसर स्वच्छ राहावा यासाठी तरुण वकिलांनी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती व प्रमुख जिल्हा न्यायाधीशांना निवेदन देऊन न्यायालयात थुंकणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्याच धर्तीवर प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस. बी. अग्रवाल यांनी परिपत्रक काढून न्यायालयाच्या आवारात थुंकणाऱ्यांवर कडक कारवाईचे निर्देश दिले आहेत.

न्यायालयाच्या आवारात थुंकल्यास दोन हजार रुपये दंड किंवा तीन महिने कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. याच धर्तीवर शिवाजीनगर न्यायालयातील पोलीस कर्मचाऱ्यांनी कारवाई सुरू केली आहे.

न्यायालयातील सर्व प्रवेशद्वारांवर न्यायालयात दाखल होणाऱ्या नागरिकांची तपासणी करण्यात येत असून, तंबाखू जन्य पदार्थ जप्त करण्यात येत आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांतर्फे दररोज न्यायालयातील सर्व प्रवेशद्वारांवर ही तपासणी करण्यात येणार आहे, असे पोलीस कर्मचाऱ्यांतर्फे सांगण्यात आले.




न्यायालयीन पोलिस कर्मचाऱ्यांनी न्यायालयात गुटखा, तंबाखू घेऊन जाणाऱ्यांवर कारवाई केली.

# शहरात कोम्बिंग ऑपरेशन

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांची झाडाझडती

पुणे : प्रतिनिधी

**गणेशोत्सवाच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून गुन्हेशाखेच्या वतीने शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. यावेळी अनेक सराईतांची झाडाझडती घेण्यात आली. त्यामध्ये रेकॉर्डवरील १६६ सराईत गुन्हेगारांपैकी ८५ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच नोंदणीपुस्तिका अद्यावत न ठेवल्यामुळे पाच हॉटेलवर कारवाई करण्यात आली आहे.**



पुण्याच्या गणेशोत्सवाची ख्याती सातासमुद्रापलीकडे आहे. त्यामुळे हा गणेशोत्सव पाहण्यासाठी देश-परदेशातून मोठ्या संख्येने भाविक येथे येतात. यावेळी चोरटे व गुन्हेगारांकडून भाविकांना लक्ष्य करण्यात येते. ही बाब लक्षात घेऊन गुन्हे शाखेच्या वतीने शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये सोमवारी दुपारी चार ते रात्री आठ या वेळेत कोम्बिंग ऑपरेशन राबविले. अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त बच्चन सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सर्व युनिट व अमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई केली. उत्सव कालावधीत गर्दीचा फायदा घेत सोनसाखळी चोरी, पाकिटमारी यासारखे गुन्हे अनेक सराईत गुन्हेगार करतात, त्यामुळे अशा गुन्हेगारी कारवायांना अगोदरच प्रतिबंध करण्यासाठी हे कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले.

मागील काही दिवसांतील देशातील घडामोडी पाहता कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून विशेष खबरदारी पोलिसांच्या वतीने घेण्यात येत आहे. यावेळी सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने हडपसर, कात्रज, कोंढव्यातील १९ लॉजची तपासणी केली. निधी लॉज (हडपसर), अश्विनी लॉज (कात्रज), न्यू रॉयल लॉज (कोंढवा), हॉटेल राज पॅलेस (कोंढवा) व हॉटेल गारवा (कोंढवा) या हॉटेल्सच्या नोंदणी पुस्तिका अद्ययावत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

> ❝ गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांची वेळोवेळी तपासणी गुन्हे शाखेच्या वतीने सुरू आहे. पुणेकरांना या आनंददायी उत्सवाचा भरपूर आनंद घेता यावा यासाठी पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. गर्दीचा फायदा घेत चोऱ्या करणाऱ्या चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी गुन्हे शाखेची साध्या वेशातील पथके शहरात तैनात आहेत. महिला सुरक्षेच्या बाबतीत देखील पोलिस दक्ष आहेत. गर्दीच्या ठिकाणी एखादी संशयास्पद वस्तू किंवा व्यक्ती आढळल्यास नागरिकांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क करावा.
>
> **अशोक मोराळे,**
> अपर पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा

**1** गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाने कासेवाडी, कामगार पुतळा, राजीव गांधी झोपडपट्टीत कारवाई करत ४८ गुन्हेगार तपासले, त्यापैकी २८ जण सापडले. युनिट दोनच्या पथकाने डायस प्लॉट औद्योगिक वसाहत, महर्षीनगर झोपडपट्टीत केलेल्या कारवाईमध्ये १८ पैकी तीन गुन्हेगार सापडले. युनिट तीनने जनता वसाहत, तुकाईनगर परिसरात पाहणी करून २१ पैकी ११ गुन्हेगारांना ताब्यात घेतले. तर तिकडे युनिट चारच्या पथकाने लक्ष्मीनगर, येरवड्यातील तपासणीत २१ गुन्हेगारांपैकी १६ जण आढळून आले, तर युनिट पाचच्या पथकाने म्हाडा कॉलनी, रामनगर, आनंदनगर, सुरक्षानगर, बिरासदारनगर, इंदिरानगर, वेताळबाबा झोपडपट्टी परिसरात कारवाई केली. त्यामध्ये २० सराईत गुन्हेगार तपासले असून, आठ जण आढळून आले.

**2** हडपसर पोलिसांच्या हद्दीत एक जण कोयता घेऊन फिरत असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार त्याला अटक केली. तसेच अमली पदार्थ विरोधी पथकाने (पश्चिम) ताडीवाला रस्ता झोपडपट्टीत १६ पैकी चार गुन्हेगारांना ताब्यात घेतले, तर अमली पदार्थ विरोधी पथकाने (पूर्व) २० गुन्हेगार तपासले. त्यापैकी १५ जण मिळून आले. तसेच मोकाअंतर्गत पूर्वी केलेल्या कारवाईतील११ गुन्हेगारांपैकी एक जण आढळून आला, तर एमपीडीए अंतर्गत पाच गुन्हेगार तपासले.

# मोबाईल चोरट्यांचा सुळसुळाट

## ८२ मोबाईल जप्त; फरासखाना १२, तर विश्रामबाग ठाण्यात ३ गुन्हे दाखल

**पुणे : प्रतिनिधी**

गणेश विसर्जन मिरवणुकीत गर्दीचा फायदा घेत मिरवणूक पाहण्यासाठी जमलेल्या नागरिकांचे मोबाईल चोरी करणारी टोळी गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने जेरबंद केली. या वेळी त्यांच्या ताब्यातून विविध कंपनीचे तब्बल ७ लाख १९ हजारांचे रुपयांचे ८२ मोबाईल जप्त करण्यात आले असून, १९ जणांना अटक करण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेले सर्वजण मालेगाव व नांदेड परिसरातील असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या वेळी फरासखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीत पाच गुन्हे केल्याची कबुली आरोपींनी दिली.

विसर्जन मिरवणुकीत होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी पोलिसांकडून खास तयारी करण्यात आली होती. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच साध्या वेशातील पोलिसांची पथके गर्दीत तैनात होती. अपर पोलिस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सूचनेनुसार कर्तव्यावर असताना, निरीक्षक गजानन पवार यांना बातमी मिळाली होती की, ढेंगळे पुलाच्या खाली नदीपात्रात चार संशयित व्यक्ती उभ्या आहेत. त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, नांदेड व मालेगाव येथून गणपती पाहण्यासाठी आल्याचे सांगितले. मात्र, संशय वाढल्यामुळे त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे १८ मोबाईल मिळून आले. मात्र, मोबाईलच्या बाबतीत विचारणा केली तेव्हा त्यांनी समाधानकारक उत्तरे दिले नाहीत. त्यामुळे त्यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली त्या वेळी त्यांनी ते मोबाईल दगडूशेठ हलवाई मंदिराजवळ गर्दीचा फायदा घेत भाविकांचे चोरल्याचे कबूल केले. तसेच, त्यांचे १४ ते १५ साथीदार चोऱ्या करण्यासाठी मिरवणुकीत आले असून, विविध भागांत ग्रुप करून ते चोऱ्या करीत असल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी तपासाची सूत्रे गतिमान करीत तत्काळ रेल्वे स्टेशन दर्गा, मालधक्का जवळील रेल्वे हॉस्पिटल, ठुबे पार्क, शिवाजीनगर येथून इतर १५ जणांना ताब्यात घेतले. या वेळी त्यांच्याकडूनदेखील विविध कंपन्यांचे ७४ मोबाईल फोन जप्त करण्यात आले.

ही कामगिरी गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चन सिंह, सहायक पोलिस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक गजानन पवार, कर्मचारी यशवंत आंब्रे, संजय दळवी, अनिल ऊसूलकर, दिनेश गंडाकुश, अस्लम पठाण, अतुल गायकवाड, विशाल भिलारे यांच्या पथकाने केली.

**बेलबाग चौकात मोबाईल चोरला**

गणेश विसर्जन मिरवणूक पाहण्यास आलेल्या उत्तम जाधव (२९) यांचा मोबाईल चोरट्यांनी पळविल्याची घटना गुरुवारी घडली.

पुढारी – दि. २१ सप्टेंबर, २०१९

# पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या तयारीतील टोळी जेरबंद

## शंकरशेठ रस्त्यावरील घटना; स्वारगेट पोलिसांनी पाठलाग करून पकडले

**पुणे : प्रतिनिधी**

शंकरशेठ रस्त्यावरील एका पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असणाऱ्या टोळीला स्वारगेट पोलिसांनी पाठलाग करून पकडले. त्यांच्याकडून घातक शस्त्रे ताब्यात घेण्यात आली.

अजहर बादशाह शेख (वय १९, बिबवेवाडी), सूरज सुधीर पाटील (३३) अंकुश नारायण धांडे (वय ३४, कात्रज), सुरेंद्र प्रेमदास वंजारी (वय २६, कात्रज) व गणेश प्रल्हाद चव्हाण (वय २४, रा. गोकूळनगर. कात्रज) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्यावर स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### आरोपी दुचाकी सोडून पसार

स्वारगेट पोलिस आरोपींची माहिती घेत असतानाच नियंत्रणकक्षात काही तरुण रस्त्यावर वाद घालत असल्याचा कॉल आला होता. ही माहिती मिळाल्यानंतर स्वारगेट पोलिस तेथे दाखल झाले. या वेळी आरोपी त्यांच्या दुचाकी सोडून पसार झालेत. मात्र, कर्मचाऱ्यांनी पाठलाग करून काही अंतरावरच त्यांना पकडले. त्यांनी काही गुन्हे केले आहेत का, याची माहिती घेतली जात आहे.



स्वारगेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना शंकरशेठ रस्त्यावरील पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या तयारीत काहीजण घातक शस्त्र घेऊन थांबले आहेत, अशी माहिती पोलिसांना मिळाली, त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक समाधान कदम व त्यांच्या पथकाने या ठिकाणी सापळा रचून त्यांना अटक केली. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याजवळ दोन लोखंडी कोयते, एक ब्लेड, मिरची पावडर तसेच दोरी असे साहित्य मिळून आले.

आरोपींचे पोलिस रेकॉर्ड असून, अजहर याच्यावर फरासखाना ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. तर धांडे याच्यावर अहमदनगर येथे सरकारी कामात अडथळा निर्माण व चोरीचा गुन्हा दाखल आहे. वंजारी याच्यावर एक गुन्हा दाखल आहे.

पुण्यनगरी – दि. २२ सप्टेंबर, २०१९

# ऐंशी लाखांचे कोरीव हस्तिदंत स्वारगेट भागात जप्त

**पुणे : प्रतिनिधी**

तेलंगणा राज्यातील एका व्यक्तीस ताब्यात घेत त्याच्याकडून कोरीव काम केलेले चार हस्तिदंत गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जप्त केले. या हस्तिदंतांची किंमत तब्बल ऐंशी लाख रुपये असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

भीमा बोग्रिया मुडावत ऊर्फ चव्हाण (वय ५०, रा. आनंदनगर, हडपसर, मूळ रा. तेलंगणा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

कोरीव काम केलेले हस्तिदंत घेऊन एक व्यक्ती स्वारगेट भागात फिरत असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट-२ पथकातील पोलीस नाईक यशवंत खंदारे आणि मोसीन शेख सूत्रांकडून मिळाली.



त्यानुसार त्यांनी भीमा मुडावत याला ताब्यात घेत त्याच्याकडून चार हस्तिदंत आणि दोन मोबाइल जप्त केले. शनिवारी रात्री उशिरा ही कारवाई करण्यात आली.

# Police start spa centre census

MUBARAK ANSARI
@VictrForceGhazi

**PUNE:** After a spate raids at various spa/massage centres for indulging in prostitution rackets, the Pune city police have begun profiling such centres at the police station level. The cops are collecting details like various government licences and employees' police verification among others.

SAKAL TIMES SPECIAL

## PROSTITUTION RACKET

- The crime branch raided Zivankaa Spa in Ashoka Mall on Bund Garden Road on Wednesday and rescued five foreigners who came here on a tourist visa but were into prostitution racket. An FIR was registered with the Koregaon Park police station against spa owner Gopal Mishra (32) of Yerawada.
- On August 27, the crime branch raided Royal 19 Thai Spa in Gultekdi for operating a prostitution racket. The police had rescued four women including two foreigners. The police arrested owner Rahul Zambare who worked as a security guard on contract with the Pune Municipal Corporation.
- The cops are collecting details like various government licences and employees' police verification among others. Some owners of these centres are claiming that cops are harassing them in the guise of maintaining a database.

However, some owners of these centres are claiming that cops are harassing them in the guise of maintaining a database. "Many spas indulge in prostitution but not all of them are a part of it. This is known to the police from the local police station as well as the crime branch who have a well oiled hafta collection system. Earlier, only policemen used to collect but now some officers have got civilians also to collect hafta on their behalf," said a business insider.

An owner of a spa from Satara Road, added, "The police asked me to submit details and I did so but even then, they are threatening to close the spa. They can barge in anytime to check and take legal action if they find anything illegal here but they are just threatening to close the business. We have got hidden cameras for them now. Why should I fear when I am not involved in any illegal activity?"

Another spa owner from Vadgaon Sheri area said, "The police in plain-clothes come to check the premises. They wanted us to share all details of the shop along with employee information and we complied but even then, they insisted on closing the business citing orders from their seniors. When I asked them to show the laws empowering them to close the shop, they backed out. If they are empowered to raid and register cases, then what is the need of threatening? They should take action."

When contacted, DCP (Crime) Bachchan Singh told Sakal Times that the crime branch is not collecting such details. "A spa/massage centre must have Shop Act licence and rent agreement besides qualified staff to run the business. We are not collecting these details," he added.

DCP (Zone 4) Prasad Akkanouru said, "We are conducting a drive to see that no illegal activities happen in massage centres."

A senior police inspector of a police station under Zone 4 denied that such drive is being undertaken even though a letter was given to a spa centre owner with the name of his police station.

Commissioner of Police Dr K Venkatesham has assured that only legal action is being taken. "There is no need to fear if a massage centre owner is doing business honestly. But we will take firm action on those found involved in illegal activities," he added.

# Elephant tusks worth ₹80L seized by city Crime Branch

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** The sleuths from Crime Branch Unit 2 of Pune city police on Saturday seized four carved elephant tusks, worth Rs 80 lakh, from a man who had come to Pune with the purpose of selling them.

Acting on a tip-off received by policemen Yashwant Khandare and Mohsin Shaikh, a team led by Police Inspector Gajanan Pawar arrested Bhima Bogriya Mudawat alias Chavan (50) of Ananad Nagar, Hadapsar, who hails from Telangana. After confirmation from the Forest Department officials that the seized objects were ivory, an FIR was registered against him for offences under Wildlife (Protection) Act.



**CONFISCATED:** Two pairs of elephant ivory tusks seized

Deputy Commissioner of Police (Crime) Bachchan Singh said that further investigating is underway about the accused's antecedent and if there is any racket.

सामना – दि. ४ सप्टेंबर, २०१९

# हडपसरमध्ये मोबाईलचोरी करणारी परप्रांतीय टोळी जेरबंद

पुणे, दि. ३ (प्रतिनिधी) – शहरासह जिल्ह्यातील विविध ठिकाणी गर्दीचा फायदा घेऊन मोबाईलची चोरी करणाऱ्या तिघांच्या परप्रांतीय टोळीला हडपसर पोलिसांनी जेरबंद केले. त्यांच्या ताब्यातून ४३ मोबाईल, एक दुचाकी मिळून एक लाख ९४ हजारांचा ऐवज जप्त केला.

किरण हनुमंतअप्पा किकी (वय २२, रा. घोरपडी गाव. मूळ रा. कर्नाटक), मधू रामू गुंजाळा (वय १९, रा. आंध्र प्रदेश) आणि राजू सीताराम राजन (वय ३५, रा. तेलंगणा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हडपसर पोलिसांकडून गस्त घालण्यात येत होती. त्यावेळी गाडीतळ मंडई परिसरात दुचाकीवर तीनजण संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून विनाक्रमांकाच्या दुचाकीवर फिरणाऱ्या किरण, मधू आणि राजू यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी शहरासह जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून ४३ मोबाईल आणि एक दुचाकी चोरल्याची कबुली दिली. गर्दीचा फायदा घेऊन नागरिकांच्या खिशातून मोबाईलचोरी केल्याचे त्यांनी चौकशीदरम्यान सांगितले. ही कामगिरी सहायक पोलीस आयुक्त ज्योत्स्ना रासम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, सहायक पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, युसूफ पठाण, संपत औचरे, राजेश नवले, अनिल कुसाळकर,

## ४३ मोबाईलसह दुचाकी जप्त

अकबर शेख, प्रताप गायकवाड, सैदोबा भोजराव, विनोद शिवले, गणेश दळवी, शशिकांत नाळे, गोविंद चिवळे, अमित कांबळे, ज्ञानेश्वर चित्ते, विजय पवार यांच्या पथकाने केली.

### काठीने मारून प्रवाशांचे मोबाईल चोरणारा सराईत जेरबंद

रेल्वे प्रवाशांच्या हातावर काठीने जोरात फटका मारून मोबाईलचोरी करणाऱ्या एका सराईताला लोहमार्ग पोलिसांच्या स्थानिक गुन्हे पथकाने शिवाजीनगर परिसरातून जेरबंद केले. त्याच्या ताब्यातून १६ हजार ५०० रुपये किमतीचे दोन मोबाईल जप्त करण्यात आले असून, दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

शाहरूख रशीद खरादी असे अटक केलेल्याचे नाव आहे. यापूर्वीही त्याच्याकडून दीड लाखाचे मोबाईल जप्त करण्यात आले होते. त्याला संबंधित गुन्ह्यात शिक्षा झाली होती. मात्र, कारागृहातून सुटल्यानंतर त्याने पुन्हा मोबाईलचोरी सुरू केल्याचे उघड झाले. मोबाईलचोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने लोहमार्ग पोलीस अधीक्षक दीपक साकोरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार शिवाजीनगर येथील सराईत गुन्हेगार शाहरूख खरादी हा त्याच्या साथीदारासह मोबाईलचोरीचे गुन्हे करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सापळा रचून खरादीला रेल्वे ट्रॅकशेजारी काठी घेऊन उभा असताना ताब्यात घेतले. चौकशीत त्याने कारागृहातून सुटल्यानंतर पुन्हा मोबाईलचोरी करीत असल्याची कबुली दिली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक मौला सय्यद, सहायक पोलीस निरीक्षक मिलिंद झोडगे, अमरदीप साळुंके, सचिन पवार, विशाल पवार यांच्या पथकाने केली.

**सामना – दि. ८ सप्टेंबर, २०१९**

# दोन सराईतांवर तडिपारीची कारवाई

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) – पुणे शहर पोलिसांकडून गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी कारवाईचा धडाका सुरू करण्यात आला आहे. दोन सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ डेंजरस ॲक्टिव्हिटी ॲक्टनुसार (एमपीडीए) कारवाई करण्यात आली आहे.

अल्ताफ ऊर्फ बचक्या इकबाल पठाण (वय २८, रा. अप्पा टिंगरे चाळ, धानोरी) आणि प्रवीण ऊर्फ भय्या प्रताप शिंदे (वय २२, रा. कसबा पेठ) अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध एक वर्षासाठी कारवाई करण्यात आली असून, त्यांची रवानगी येरवडा मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांनी आदेश दिले आहेत.

अल्ताफ विश्रांतवाडी पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहे. त्याच्याविरुद्ध बंडगार्डन, कोंढवा व कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे ९ गुन्हे दाखल आहेत. तर, प्रवीण फरासखाना पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावरदेखील शिवाजीनगर, फरासखाना, विश्रामबाग व समर्थ पोलीस ठाण्याच्या परिसरात घातक हत्यारे बाळगून खुनाचा प्रयत्न, दुखापत, खंडणी मागणे, दंगा, वाहने जाळणे, घरात प्रवेश करणे, धमकावणे असे ७ गुन्हे दाखल आहेत. गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई केली होती; मात्र तरीही त्यांच्या गुन्हेगारी कृत्यावर कोणताही परिणाम दिसून आला नाही; तसेच दोन्ही गुन्हेगारांची परिसरात मोठी दहशत असल्यामुळे सर्वसामान्य नागरिक तक्रार दाखल करण्यास पुढे येत नव्हते. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र टाइम्स – दि. १४ सप्टेंबर, २०१९**

# महिला पोलिसांमुळे छेडछाडीला आळा

**Rohit.Athawle**
@timesgroup.com
Tweet : @ARohitMT


स्वप्नील शिंदे

**पुणे :** गर्दीत एक युवक तरुणीच्या अंगचटीला येण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत होता. परंतु, त्याच वेळेस तेथे असलेल्या साध्या वेशातील महिला पोलिस अधिकाऱ्याने त्या तरुणाला बखोटीला धरून गर्दीतून बाजूला घेऊन गणवेशातील पोलिसांच्या हवाली केले. गुरुवारी पहाटे टिळक रस्त्यावर हा प्रकार घडला.

साध्या वेशातील महिला पोलिसांमुळे छेडछाडीच्या घटनांना अटकाव घालण्यात पोलिसांना यंदा यश आले. निरीक्षक ते महिला कर्मचारी, तसेच दामिनी पथक शहरातील सर्वच मिरवणूक मार्गावर गस्त घालत असल्याने टवाळखोरांवर जरब बसली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बंदोबस्ताची रचना करतानाच काही पातळ्या कर्मचाऱ्यांना ठरवून दिल्या होत्या.

टिळक चौक (अलका चौक), बेलबाग चौक, टिळक रस्ता, कुमठेकर रस्ता, लक्ष्मी रस्त्यावर महिला पोलिसांचे पथक यंदा साध्या वेशातील महिला पोलिसांची संख्या वाढविण्यात आली होती.

मात्र, महिला-मुली थांबलेल्या ठिकाणी जोरात पिपाणी वाजविणे, गलका करण्याचे प्रकार मिरवणूक मार्गावर घडले. त्यामुळे या ठिकाणी असलेल्या साध्या वेशातील महिला पोलिस, दामिनी पथकाने अशा प्रकारे त्रास देणाऱ्या किंवा गर्दीत पाकीट, मोबाइल चोरणाऱ्या सुमारे ६८ जणांना ताब्यात घेतले.

TIMES OF INDIA - 07 September, 2019

# Four members of Delhi gang steal luxury watches from SB Road mall

Times News Network

**Pune:** Four members of a Delhi-based gang, which goes by the moniker 'Handsome Group', stole four luxury Rado wristwatches worth over Rs5 lakh from an SB Road mall. Three of them were arrested on Monday.

The incident occurred on August 8, when three of the men, posing as customers, diverted the attention of the staff and stole the watches.

The theft was discovered when the shop checked its inventory on August 23. A shop official registered a complaint with the Chatushrungi police on August 25.

Inspector Anjum Bagwan (unit IV) led the investigation, which revealed that the suspects took a cab from the mall to a lodge in Mangalwar Peth. The police questioned the cab driver, and got names, addresses and cellphone numbers of the four men from the lodge's register.

Police said the cellphone numbers were fake, but they narrowed them down to six numbers of the same series. By trial and error, they traced one number to a suspect, Ashish Bisht (30).

Police then found out that the suspects travelled from Delhi to Pune by flight. The police team coordinated with the cab aggregator and the airlines to track down three men — Bisht, Akash Dakha (26) and Ajmersingh (32). "A police team went to Delhi, arrested the trio and brought them to Pune," inspector Bagwan said.

The suspects have been remanded in police custody till September 11. The trio admitted under questioning that they attempted theft at two other malls in Pune, but were unsuccessful. "After stealing the watches, they went to Mumbai, where they stole a T-shirt from a mall and were caught and handed over to police. They were later released on bail," police said.

"The four men are part of a larger, 10-12 member outfit, which targets malls in Pune, Mumbai, Delhi and other cities," Bagwan added.

## WHO ARE THEY?



- The gang of 10-12 men steals valuables from malls in Pune, Mumbai and Delhi
- Four members of the gang flew to Pune and stole four luxury watches worth ₹5 lakh from an SB Road mall
- Posing as customers, three men diverted the attention of the mall staffers and stole the watches
- The fourth suspect waited outside
- The suspects then took a cab to a lodge in Mangalwar Peth
- The police coordinated with the cab aggregator and airlines officials, traced the trio and arrested them
- The fourth is on the run

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- आर.के.गोसावी, पोलीस हवालदार ५३८८, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उदेशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अमंलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पन पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करत आहे. नागरिकांच्या मनामध्ये पोलीसांविषयी चांगल्या प्रकारची भावना निर्माण होत आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचेही मनोबल वाढलेले असुन ते ही चांगली कामगिरी करुन आपले नाव व फोटो वर्तमान पत्रामध्ये येवुन त्याचे कात्रण दर्पण पुस्तकामध्ये समाविष्ट होणेसाठी चांगली कामगिरी करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( आर.के.गोसावी )
पोलीस हवालदार ५३८८
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.

प्रति,

मा. पोलीस आयुक्त सो,
पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट :- के एस पलांडे पोलीस शिपाई ८५६४ चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय :- दर्पण पुस्तिकेच्या अभिप्रायाबाबत...

महोदय,

/- उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी चंदननगर पोलीस स्टेशन या ठिकाणी ०३ वर्षापासुन नियुक्तीस असुन सायबर विभागामध्ये काम करत आहे. मा.पोलीस आयुक्त सो यांनी दर्पण पुस्तीकेच्या माध्यमातुन पोलीसांनी केलेली कामे, गुन्हयाचा लावलेला शोध, जेष्ठ नागरिकांना केलेली मदत व गुन्हास प्रतिबंध होणेसाठी केलेल्या उपाययोजना तसेच सामान्य नागरीकांना येणा-या अडचणी कशा सोडवाव्या या सदंर्भात केलेले मार्गदर्शन केले आहे. तसेच पोलीसांनी केलेल्या कामचे प्रशिस्ती प्रत्रक दपर्ण या पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासमोर मांडले आहे. त्यामुळे पोलीस व सामान्या नागरीकामध्ये चांगले संबध तयार होत आहेत. त्यामुळे दर्पण ही पुस्तीकेचे पोलीस स्टेशनला येणारे नागरीक खुप कौतुक करत आहेत.

दर्पण पुस्तीका पोलीसांनी केलेल्या कामाचा सन्मानाबाबत मा.पोलीस आयुक्त सो. यांचे खुप खुप अभिनंदन. माननियांना सादर

तरी सदर माहिती अवलोकन व आदेशार्थ सविनय सादर.

मा.सादर व्हावे
दि. १६/०५/२०१९

पोलीस शिपाई ८५६४
चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर



चुकलेला मुलगा विसावला आईच्या कुशीत
At junctions of Smart City, an 'intelligent' syste
o help manage Pune's many traffic problems
आयुक्तांकडून कॉन्स्टेबलला
मिळाले 'सरप्राईज गिफ्ट'
गुन्हे शाखेने ८०
लाखांचे हस्तिदंत
पकडले
नदीत पडलेल्या मुलाचे पोलिसांनी वाचविले प्राण
तब्बल २२ वर्षे फरार असलेल्यास केले जे
स्थानबद्धतेतून सराइतांवर पोलिसांच
व्हिडिओ कॉल सुरु ठेवून आत्महत्येचा प्रयत्न
क्तृत्वाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध
चोरांची टोळी अटके
८२ मोबाइल जप्त
तत्काळ मदतीला धावून
पोलिसांनी वाचवले प्राण
द्धिवादाची जोपासना करा
नदीत उडी मारलेल्या
तरुणाला वाचवले
जच्या नावाखाली चालणा
या व्यवसायाचा पर्दाफाश
तंबाखूजन्य पदार्थ
आणणाऱ्यांवर कारवाई
दागिनेचोर जेरबंद
ILLEGAL SAND TRANSPORTATION
Driver arrested for stealing trucks
attached by revenue dept officials
डॉक्टरच्या वेशातील वाहनचोरास अटक
नावट वस्तू बनवणाऱ्या कंपनीचा पर्दाफाश
गुन्हेगार जेरबं
वाघाच्या कातड्याची तस्करी
e Branch busts inters
बेकायदा पिस्तूल
बाळगणारा अटकेत
पिस्तुलाची हौस पडली महागात!
दोघांना अटक, भारती विद्यापीठ पोलिसांची कारवाई
दोन दिवसांत ३७५ कोयते जप्त